# मराठे व इंग्रज.

( पुस्तक-परीक्षण. )

—लेखक—

दत्तो वामन पोतदार. बी. ए.

मुद्रक व प्रकाशक

केशव रावजी गोंधळेकर, जगद्धितेच्छु प्रेस,

५०७ शनवार पेठ, पुणें.

शके १८४४ सन १९२२.

किंमत ८४

न्यू पूना बुकडेपो,
गिरगांव

॥ श्री ॥

# उपोद्घात.

मि० आश्विन शु० ६, १८४० रोजीं 'मराठे व इंग्रज' या ग्रंथाचें विस्तृत परीक्षण लिहून पूर्ण झालें. माझे मित्र इतिहाससंशोधक कै० पांडोबा पटवर्धन यांनीं आपल्या 'राष्ट्रहितैषी' या पत्रांत त्याचा कांहीं भाग प्रसिद्ध केला. सर्व परीक्षण पुस्तकरूपानें काढावें असा मूळ संकेत होताच. राष्ट्रहितैषींतील लेखांक वांचून पुष्कळ वाचकांनींहि तसाच हेतु आग्रहानें दर्शविला.

या संकेताला आज चार वर्षें संपूर्ण होत आलीं. पण तो सिद्धीस गेला नाहीं. दरम्यान 'मराठे व इंग्रज' या ग्रंथाच्या दोन नवीन आवृत्ति हि निघून गेल्या. या आवृत्ति पुनर्मुद्रणरूप च आहेत. त्यामुळें परीक्षणाचा पवित्रा फिरविण्याचें कारण पडलें नाहीं. प्रस्तुत परीक्षणात्मक टीकेंतलि विवेचन आणखी हि वाढवितां येण्यासारखें आहे. पण मग परीक्षणात्मक निबंधाचें स्वरूप जाऊन तो एक स्वतंत्र ग्रंथ च होईल. विषयमाहात्म्य पाहतां असा एक च काय, पण अनेक ग्रंथ रचले जावे इतकें मोठें अलौकिक तें आहे. त्याकडे अधिक लक्ष्य लावण्यास हें परीक्षण अल्पांशानें जरी कारणीभूत झालें तरी तें प्रसिद्ध करण्याचा एक प्रधान उद्देश साधला असें म्हणतां येईल. जगद्धितेच्छु छापखान्याचे मालक श्री. केशव रावजी गोंधळेकर यांनीं उत्सुकतेनें हा निबंध छापून प्रसिद्ध केला, याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

भाद्रपद व० १२, शके १८४४ }
पुणें. } दत्तो वामन पोतदार.

———

# मराठे व इंग्रज.

( पुस्तक–परीक्षण. )

उत्तरोत्तर मराठी वाङ्मयास मोठें तेज चढत चाललें आहे खास. पहा, कीं तत्त्वज्ञानांत 'गीतारहस्य', महच्चरित्रांत भावेकृत 'चक्रवर्ति नेपोलियन' असे उत्तमोत्तम ग्रंथ लागोपाठ निर्माण झाले. प्रसिद्ध विद्वद्वर्य रा. नरसोपंत केळकर यांनीं 'मराठे व इंग्रज' या नांवाचा ग्रंथ लिहून मराठेशाहीचें शतसांवत्सरिक वाङ्मयश्राद्ध नुकतेंच केलें आहे.

बरोबर शंभर वर्षांपूर्वी आम्ही खऱ्या 'स्वराज्या'स मुकलों ! ते दिवस तर आतां गेलेच ! कांहीं केल्या परत यावयाचे नाहींत ! वर्तमाननदीचा तीर ओलांडून ज्या गोष्टी पैलाड गेल्या त्या स्वरूपतः कायमच्याच जातात ! मागती येत नाहींत. आतां नाना फडणीस, शिवाजी महाराज, खंडो बल्लाळ हे महाराष्ट्रीय पुण्यात्मे, अगर पानिपत, मोतीतलाव, राक्षसभुवन येथें वाहिलेल्या रक्तांच्या नद्या, किंवा नाचलेले घोडे आपणांस पुनरपि केव्हांहि प्रत्यक्ष दिसावयाचे नाहींत ! असें जरी आहे तरी ईश्वरानें मनुष्यास 'स्मरणशक्ति' व 'कल्पनाशक्ति' अशा अद्भुत शक्ति दिलेल्या आहेत. यांच्या साहाय्यानें गतकालीं घडलेले प्रसंग, होऊन गेलेल्या व्यक्ति वगैरे यथावत् सजवून मनुष्य आपल्या मनास खेळवूं शकतो ! चालू घटकेचा मनाला जरा विसर पडून जुन्या काळच्या आठवणींत पोहणें हें ब्रह्मानंदाइतकें सुखप्रद वाटतें ! उदासवाणें झालेलें मन पूर्वकालाच्या पुण्यस्मरणानें ताजेंतवानें करतां येतें हा ईश्वराचा आपणां जीवांवर मोठाच उपकार आहे म्हणावयाचा ! जुने सुखप्रसंग आठवले कीं आंगावर रोमांच उभे राहतात ! जुने दुःखप्रसंग मनासमोर आले कीं डोळ्यांतून पाणी खळत नाहीं ! भोंवतालचें जग विसरून आपलें देहभान याप्रमाणें जुन्याच्या आठवणींत नाहींसें होत होत कधीं दिवसच्या दिवस तर कधीं रात्रीच्या

रात्री केव्हांच निघून जातात ! शंभर वर्षांपूर्वीचा आमचा स्वतंत्र महाराष्ट्र कोणत्या परमेश्वरी सूत्रानें आज अन्यतंत्र झाला हा विचार मनांत येतांच चिंतामग्न झाला नाहीं असा कोणता अस्सल मराठा आढळेल !

असा सर्व मराठ्यांच्या मनाला चटका लावणारा विषय हातीं घेऊन रा. नरसोपंतासारख्या विद्वान्, विचारी व कसलेल्या लेखकानें प्रस्तुतचा ग्रंथ रचला असल्याकारणानें त्याच्यावर लोकांनीं आधाशाप्रमाणें उड्या टाकून त्याची पहिली आवृत्ति चुटकीसरशी फस्त करावी यांत आश्चर्य नाहीं ! आपल्या भिकारी माहाराष्ट्रांत असले चमत्कार अधिकाधिक घडूं लागले यावरूनच काळ कसा वहात आहे याची कल्पना होईल. हेच नरसोपंत लिहिणारे; आणि आयर्लंडच्या इतिहासासारखा मोठा उद्बोधक विषय त्यांनीं मोठ्या परिश्रमानें व कौशल्यानें नटविला असतांनाहि आज दहा वर्षे तो धूळ खात पडावा, परंतु त्याच केळकरांची ही नवीन कृति इतकी लोकप्रिय व्हावी हें केवळ विषयमाहात्म्यहि नव्हे किंवा लेखकमाहात्म्यहि नव्हे तर या दोहोंच्या जोडीचें कालमाहात्म्यहि हा परिणाम घडवून आणण्यास तितकेंच कारणीभूत झालेलें आहे.

प्रकृत ग्रंथाची कल्पना डोक्यांत घोळत असतां रा. केळकरांनीं ती प्रस्तुत लेखकाजवळ बोलून दाखविली होती. ता. ३ जूनला पेशवाईचें अथवा मराठशाहीचें शतसांवत्सरिक श्राद्ध पडतें तेव्हां ती पर्वणी साधून मराठी इतिहासाचा व्यासंग करणाऱ्या व प्रेम बाळगणाऱ्या विद्वानांनीं जुन्या मराठेशाहीच्या एकेका आपल्या आवडत्या अंगाचें वर्णन करावें व असें अनेक विद्वानांच्या विविध समालोचनाचें एक गोंडस चित्र सजवून मराठी वाचकांस त्या मुहूर्तावर सादर करावें अशी रा. केळकर यांची मूळ कल्पना होती. परंतु एका वर्षाच्या अवधींत ही गोष्ट सिद्धीला जाणें कठिण असें अनुभवाला आल्यामुळें रा. केळकरांना आपली कल्पना स्वतःच तडीस न्यावी लागली. स्वराज्याचा धौशा लावण्याची गडबड असतां रा. केळकरांनीं तसाच नेट धरून आपला संकल्प पुरा केला याबद्दल त्यांचे सर्व मराठी वाचकांनीं उपकार स्मरले पाहिजेत. इतर मराठी इतिहास-पंडितांचे विचार एकत्र करून ओगरण्याचा रा. केळकर यांचा हेतु जरी सिद्धीस गेला नाहीं तरी मिरजेचे प्रसिद्ध इतिहाससंशोधक रा. वासुदेव-

शास्त्री खरे यांची विस्तृत व खणखणीत प्रस्तावना त्यांनीं वाचकांस मिळवून दिल्यामुळें पुस्तकाचें मूळचें महत्त्व व मनोरंजकपणा अधिक वाढला आहे.

खरें म्हटलें तर, मराठे व इंग्रज यांचा संबंध कसा व केव्हां आला, पुढें त्यांचें स्वरूप कसकसें व कां फिरलें याची सांगोपांग मीमांसा करणें हें काम अत्यंत गुंतागुंतीचें, बिकट व जोखमीचें आहे. इंग्रजांची बाजु आपणांपुढें आजवर पुष्कळ इंग्रज लेखकांनीं मांडली आहे. परंतु मराठ्यांच्या बाजूचें म्हणणें अद्याप पाहिजे तितकें पुढें आलेलें नाहीं. 'मराठे व इंग्रज' या विषयाचा खोल विचार करतां येईल व निरनिराळ्या बाबींचा चांगला बिनधोक छडा लावून विविध प्रसंगांची गुंतागुंत नीट उलगडतां येईल, त्यांचे स्थूलसूक्ष्म कार्यकारणसंबंध बिनचूक ताडतां येतील अशी सामग्री आज मनाजोगती आपणांजवळ आहे असें वाटत नाहीं. मराठ्यांची बाजू प्रगट होण्याजोगीं साधनें प्रसिद्ध करण्याचा उद्योग आपल्या महाराष्ट्रांत आज २५।३० वर्षें अव्याहत चालला आहे. इतिहासाच्या संबंधें रा. राजवाडे, पारसनीस, खरे, साने प्रभृति; काव्यादिसंबंधें रा. भावे, देव, चांदोरकरप्रभृति शिलाताम्रपटादिकांसंबंधें भांडारकर, पाठकप्रभृतींचें श्रम सर्वांस महशूर आहेत. बंगाल्यांत प्रो. सरकार हे फारसी साधनांवरून संकलनें प्रसिद्ध करीत आहेत. रॉलिनसन, किंकेड अशांसारखे इंग्रजहि अधूनमधून कांहीं चुकतमाकत लिहीत असतात. भारत- इतिहास--संशोधकमंडळ, भांडारकरप्राच्यविद्यामंदिरादि संस्था निघून संघटित स्वरूपाचें संशोधन अलीकडे चांगलें जोराऊ लागलें आहे. एकंदरींत सामग्री पुष्कळच मिळाली आहे, परंतु चढणीवर जों जों जावें तों तों क्षितिजाचा जसा विस्तार होत जातो, तसेंच जों जों एका मागून एक असे साधनग्रंथ प्रसिद्ध होत आहेत तों अज्ञात भागाचेंहि क्षेत्र वाढत जात आहे. मराठे व इंग्रज यांच्या परस्परसंबंधापुरताच जरी विचार केला तरी सुद्धां श्री शिवाजीमहाराजांपासून आरंभ करून गेल्या २०० वर्षांचा इतिहास आपणांपुढें स्पष्ट व खुलासेवार पाहिजे. आजची सामग्री पाहिली तर साधारणपणें इ. स. १७५० ते १८०० पावेतों म्ह. २०० पैकीं सुमारें शेवटच्या ५० वर्षांची हकीकत बरीच समाधान-

कारक मिळालेली आहे. थोरले बाजीराव, बाळाजीपंत नाना, संभाजी, शिवाजी असें जों जों मागें जावें तों तों अधिकाधिक अंधारांत आपणांस चांचपडत राहावें लागतें ! त्यांतल्या त्यांत ज्याला आपण राजकीय म्हणून संबोधितों, तसल्या बाबींची कांहीं ठोकळ ठोकळ माहिती थोडी-बहुत प्रकाशित झाली आहे. सामाजिक, देवधार्मिक, कार्षिक, आर्थिक, शास्त्रीय, बौद्धिक इत्यादि भिन्नभिन्न राष्ट्रांगांच्या बद्दल कांहीं म्हणण्याजोगी माहिती बाहेर आलेली नाहीं. परंतु शोधकांचा हुरूप, अंदाज व अनुभव असा पक्का आहे कीं, आणखी सुमारें १०।१२ वर्षांत असली बरीच माहिती हातीं लागेल व जुन्या गोष्टींचे अनेक रस्ते स्वच्छ दिसूं लागतील. या सर्व रस्त्यांनीं आपणांस जरा संथपणें प्रवास करतां आला म्हणजे भोंवतालची सर्व पूर्व सृष्टि मनापुढें उभी करतां येईल व तिला पुष्कळ प्रश्न विचारून आपलें समाधानहि करून घेतां येईल.

सामग्री मनाजोगती नाहीं म्हणून विषयाचा परामर्षच घेऊं नये हें म्हणणें चुकीचें आहे. कारण तसेंच म्हटलें तर या जंगम सृष्टींत सामग्रीचा पुरा अंत पाहणें सर्वथा अशक्य आहे. सामग्री काय किंवा तिचा परिपाक काय थोडक्याच काळांत नासून निरुपयोगी होणारच आणि इतकेंहि करून हाताशीं असलेली सामग्री घेऊन सिद्धांत तयार केले, तरी त्यानें एकाच वेळची भूक फार तर शमणार. पुनः नवी भूक लागतच राहणार व तिची शांति करण्यासाठीं 'गृहसिद्धचरुहोमे विनियोगः' हा मंत्र पुनः म्हणावयास पाहिजेच ! हाच न्याय ग्रंथासहि लागू आहे. आजची विचाराची भूक आजच्या सामग्रीच्या मानानें शमविण्याचें कार्य जितपत त्या ग्रंथाकडून साधेल तितकी त्या ग्रंथाची योग्यता ठरणार. आतां जसे मोरांबे अधिक काळ टिकतात किंवा रसायनें, मात्रा वगैरे जों जों जुनाट तों तों गुणाला ज्यास्त उतरतात तसें कांहीं ग्रंथांचें होतें. भारत रामायण हीं याचीं उदाहरणें होत. तथापि आमच्या इतिहासविषयांत असा अमर ग्रंथ होणेंच संभवत नाहीं. ठाम कायमपणा असा या विषयांत नाहीं. जसा बीजाचा वृक्ष बनतो तो मूळ बीजाहून पुष्कळच वाढलेला व निराळा दिसतो, तथापि अंतर्यामीं त्यांची एकात्मता मात्र अनुस्यूत ओळखतां येते तसेंच इतिहासग्रंथाचेंहि आहे. मूळ बीजाला नेहमीं खत-

पाणी मिळून तें आपलें जुनें रूप टाकून त्यांतूनच नवीन रूप धारण करीत करीत वाढत जाणार. तसाच इतिहासविषय मूळाच्या खाणाखुणा कायम ठेऊन नेहमीं बदलत व फैलावत राहणार. यांत पूर्णावस्था नाहीं. या दृष्टीनें विचार केला म्हणजे रा. केळकर यांना स्वतःलाच ग्रंथ ' मना-जोगता ' झाला नाहीं असें वाटत असल्याचें ते कां म्हणतात तें समजून येईल. रोज नवीन साधनें बाहेर येत आहेत त्यामुळें कालची रचना आज कायम ठेवतां येत नाहीं. नमुनेदार सणंग तयार करण्यासारखी स्थिति जरी आज नाहीं, तरी उपलब्ध साधनांचें सूत विणून एक घडोतें तयार करण्यास मुबलक वाव होता व रा. नरसोपंतांचा प्रयत्न असाच समजला पाहिजे हें उघड आहे.

ग्रंथाच्या पूर्वार्धाचीं १५६ व उत्तरार्धाचीं १४६ मिळून सुमारें ३०० पानें आहेत. खेरिज रा. खरेशास्त्री यांची प्रस्तावना २५ पानें व सूची ७ पानें व उपोद्‌घात २ पानें इतका ग्रंथ आहे. पूर्वार्ध हकीकतीचा आहे व उत्तरार्ध विवेचनाचा आहे. पूर्वार्धाचे पूर्वरंग व उत्तररंग असे दोन भाग पाडिले आहेत. घाईमुळें बरींच अशुद्धें तशींच राहिलेलीं आहेत असें दिसतें. छपाईच्या अशुद्धांपैकीं पुष्कळ केवळ पहिल्या पहिल्यानें ठसे जुने व घांसटलेले वापरावे लागल्यामुळें ठिकठिकाणीं कानामात्रा वगैरे उडून गेल्यामुळेंच झालेलीं दिसतात; यामुळें त्यांची नोंद करीत नाहीं.

पुस्तकाचें स्वरूप मनोहारि करण्यासाठीं या महागाईच्या काळांतहि कागद उंची वापरला आहे. एक चित्र व चार नकाशेहि दिले आहेत. चित्रें आणखीहि असावींत असें आमच्याप्रमाणें ग्रंथकर्त्यासहि वाटत असलेंच पाहिजे. विशेषतः इंग्रज व मराठे या दोघांचाहि विशेष संबंध ध्यानांत येईल अशीं स्मारक व उद्बोधक चित्रें द्यावींत. उ. बाजीराव, अल्फिष्टन, नाना, दौलतराव, " मालिट ' , वेलिंग्टन. " हिष्टीण " , " डभई " , " पेरू " इ. ऐतिहासिक व्यक्ति; आसई, वडगांव, बोरघाट, पुणे–संगम खडकी, कोरेगांव, इ. युद्धभूमी.

तसेंच तत्कालीन पोषाख–इंग्रजी व मराठी, शिवराई व कंपनीचीं वगैरे नाणीं, मराठा घोडेस्वार व इंग्रज घोडेस्वार व शिपाई, त्यांचीं हत्यारें व साज त्यावेळचीं गलबतें वगैरे व त्यांचीं अवजारें, तोफा तरवारी

गाडे इ. जुनें मुंबई बेट, ' गाडर ' लांब मजल मारून आला तो रस्ता, ' अपेशी ' राजाकडून वस्त्रें झालेल्या शत–अपेशी राघोबाच्या पलायनाचा मार्ग, इत्यादि पुष्कळ चित्रें व नकाशे देण्यासारखे आहेत. चित्रशाळेंतच छापल्या गेलेल्या अशा लोकप्रिय पुस्तकाच्या अंगावर असे चित्रालंकार पहावयास सांपडूं नयेत तर कोठें सांपडावेत ! खटपट व खर्च सोसेल तर हा शृंगार अवश्य करावा.

पुस्तकांत नकाशे दिले आहेत त्यांतील रंगांचा अर्थ कळण्यास अडचण पडली नाहीं तरी तो लिहून ठेवणें जरूर आहे. नकाशांत एक वैगुण्य असें दिसलें कीं त्यांत फक्त इंग्रजांचा मुलुख तांबडा केला आहे. मराठी साम्राज्याचा भाग नकाशांत रंगवून दाखविला नाहीं. मराठ्यांचा मुलूख ' भगव्या ' रंगांत दाखवावा अशी आमची सूचना आहे. मराठी व इंग्रजी मुलूख कसकसे कमीजास्त होत गेले हें एकाच चित्रांत निरनिराळ्या रंगांनीं दाखविलें असतें म्हणजे विषय सहज ध्यानांत राहिला असता. मराठे व इंग्रज यांचा " समकालीन उत्कर्षापकर्षा " चा चित्रपट पुढें करावयास पाहिजे. नुसत्या इंग्रजांच्या उत्कर्षाचा चित्रपट एकांगी भासतो.

ग्रंथाला ठसा वळणदार व सुंदर वापरला आहे. पुस्तकाचा आकार व बांधणी वगैरे चांगलीं आहेत. किंमत २ रु. म्हणजे माफकच आहे.

ग्रंथाच्या अंतरंगाचा परिपोष, सूची व प्रस्तावना यांच्याद्वारें चांगला झाला आहे. सूचीकार रा. आपटे यांचा या विषयाचा अधिकार व व्यासंग नामांकित आहे. प्रस्तावनाकर्ते रा. वासुदेवशास्त्री खरे हे तर मराठी–इतिहास या विषयाशीं एकाकारच झालेले पंडित आहेत. खुद्द ग्रंथकर्ते हे उत्तम विद्वान्, बहुश्रुत व कसलेले लेखक असून मोठे समतोल विवेचक म्हणून त्यांचा योग्य लौकिक आहे. इतर अनेक विषयांप्रमाणें या मराठी इतिहास विषयावरील आपला अधिकारहि मोठा असल्याचें त्यांनीं या ग्रंथाचे द्वारें सिद्ध केलें आहे.

अशी या तीन लेखकांच्या लेखण्यांची ही ग्रंथरूपी त्रिवेणी–अथवा त्रिलेखणी म्हणा पाहिजे तर–मिळणी मोठीच रमणीय झाली आहे यांत आश्चर्य नाहीं !

# पूर्वार्ध.

पूर्वार्धांत इंग्रजांचा हिंदुस्थानाशीं संबंध केव्हां, कसा व कां घडला तें थोडक्यांत सांगून नंतर श्रीशिवाजीमहाराजांपासून अथवा इ० स० १६४८ त महाराजांनीं राजापूरच्या इंग्रजी वखारीवर नजर दिल्यापासून तों मराठ्यांच्या हातांतून त्यांच्या स्वातंत्र्याबरोबरच दिल्लीअटकेपर्यंत वाढलेली त्यांची सत्ताहि इंग्रजांनीं हिसकावून घेऊन आपणांस हिंदुस्तानाचे चक्रवर्ति बनवीपर्यंतचा वृत्तांत या पूर्वार्धांत दिलेला आहे. निव्वळ मराठी वांचकांना या घडामोडीची इतकी खुलासेवार हकीकत सांगणारा हाच पहिला मराठी ग्रंथ असें म्हणण्यास हरकत नाहीं. बडोद्याचे सुप्रसिद्ध विद्वान् इतिहासकार रा. गोविंदराव सरदेसाई यांनीं आज १५।२० वर्षे व्यासंग व परिश्रम करून सर्व हिंदुस्थानाचा मोठा विस्तृत इतिहास लिहिण्याचा फार स्पृहणीय व उपयुक्त उद्योग चालविला आहे.'मराठी रियासत' मुसलमानी रियासत ' व ' ब्रिटिश रियासत ' असे तीन भाग करून त्यांनीं मुसलमानी रियासत संपविली आहे व मराठी व ब्रिटिश रियासतीचे पूर्वार्ध प्रसिद्ध केले आहेत. सांप्रत ते मराठी रियासतीचा उत्तरार्ध लिहित आहेत. रा. सरदेसाई यांनीं लिहिलेले ग्रंथ ६००।७०० पृष्ठांचे असून त्यांतील माहिती सविस्तर व तपासून दिलेली असून समतोलबुद्धीनें व राष्ट्रीयदृष्टी न विसरतां दिलेली आहे. रा. सरदेसाई यांचे ग्रंथ म्हणजे वर्तमान मराठी वाङ्मयाचें मोठेंच भूषण आहे.अन्यप्रांतीय देशी भाषांत तसे ग्रंथ असल्याचें माहित नाहीं. परंतु रा. सरदेसाई यांनीं आपल्या ब्रिटिश अगर मराठी रियासतीचा उत्तरार्ध अद्याप लिहून प्रसिद्ध केला नसल्यामुळें मराठी वाचकांची मोठी गैरसोय झालेली आहे. विचार केला तर असें दिसेल कीं, मराठी व ब्रिटिश रियासतीचा उत्तरार्ध म्हणजे एकाच विषयाचीं दोन आंगें आहेत. असो. मुद्दा काय कीं मराठींत सन १७०० ते १८०० या शतकांतील हिंदुस्थानांतील उलाढालींचा लोकानुरंजक पद्धतीनें परंतु सत्यास धरून लिहिलेला सुसंगत व खुलासेवार वृत्तांत आजमित्तीस उपलब्ध नाहीं. त्यामुळें रा. केळकर यांस सदर पूर्वार्ध विस्तारानें लिहिणें भाग पडलें. विषयाचा विवेचनात्मक जो मुख्य उत्तरार्ध तो आंखडता घेऊन पूर्वार्धाला

अधिक जागा त्यांनीं दिली त्यायोगानें उत्तरार्धांतील विवेचनाच्या मनोऱ्याला आधारभूत जो हकीगतीचा चबुत्रा त्यावर आपलें ठाण मांडून नजरबाज वाचक मनोऱ्यावर धिटाईनें, कौतुकानें व बारकाईनें लांबून, आंतून अथवा जवळून आपल्या नजरेचें निशाण चालवूं शकतो. पाया म्हटला कीं दोन अंगुळें वाढताच धरावा लागतो, म्हणजे वरच्या रचनेस जोर सांपडतो. त्याचप्रमाणें विवेचनाला आधारभूत हकीकत जरा वाढली तरी चिंता नाहीं. पूर्वार्ध १५२ पानें आहे, तो आणखी वाढला असता तरी हरकत नव्हती.

मराठी बखरी व फॉरेस्ट वगैरेंचे ग्रंथ आधाराला घेऊन रचलेला हा पूर्वार्ध चांगला उतरला आहे. आतां रा. खरे शास्त्री यांनीं प्रस्तावनेंत सुचविल्याप्रमाणें यांतले निर्देश क्वचित् बिनचूक नसले तरी...वैगुण्य येत नाहीं ! ! आम्हांस हा सर्व मजकूर रुजू घालावयास फावलें नाहीं. तें फार परिश्रमाचें व सावकाशीचें काम आहे. परंतु ग्रंथाचा द्वितीयावतारहि झाल्याकारणानें तूर्त तो नाद सोडणें प्राप्त आहे. एक दोन चुका आढळल्या त्या चुकून राहिल्या असाव्यात असें दिसतें.

| | |
|---|---|
| पृ० ४१ | " नाना फडणविसांकडे " स्पेन्सर यास पाठविण्यांत आलें असें लिहिलें आहे तें अर्थात् नानासाहेब पेशव्यांकडे असें पाहिजे. |
| पृ० ४३ | ओळ १–"पेशव्यांकडे"या ऐवजीं पेशव्यांकडून असें पाहिजे. |
| पृ० ४८ | ओळ २–"शिवराम गोविंद" बद्दल गोविंद शिवराम पाहिजे. |

पूर्वार्धाचा मुख्य कथाभाग संपल्यावर ' मराठा राजमंडळ व इंग्रज' या सदराखालीं गायकवाड, भोसले, शिंदे, होळकर, पटवर्धन हीं अशीं प्रमुख मराठी घराणीं व इंग्रज यांचा संबंध थोडक्यांत एकत्र वर्णिला आहे.

[ राजमंडळ हा शब्द आमचे माहितीप्रमाणें सातारकर महाराजांभोवतालच्या मुत्सद्दी व वीरमंडळासच फारकरून अनुलक्षून जुन्या कागदांतून येतो. शिंदे, होळकर, पटवर्धन हे राजमंडळांत गणतां येत नाहींत. हा सर्व पेशव्यांचा परिवार होय. सबब मथळ्यांतून ' राजमंडळ' शब्द काढावा. ]

आमच्या मतें यांत " तंजावरकर भोंसले व इंग्रज' व 'गुत्तीकर घोरपडे व इंग्रज' अशीं कांहीं प्रकरणें अवश्यमेव जोडावयास हवीं. या दोन्ही घराण्यांचा इंग्रजांशीं संबंध कर्नाटकांतील घालमेलींत पुष्कळच आला.

तसेंच इंग्रजांचीं ऋणानुबंधी मराठी घराणीं व व्यक्ति, लाला सेवकराम किंवा रणछोड यांसारखे मराठ्यांचे इंग्रजांकडील व मुष्टीण, मालिट यांसारखे मराठ्यांकडील इंग्रजी वकील यांची एकत्र माहिती संकलित व त्रोटक रीतीनें दिली असती तर उपयोगी झाली असती.

पूर्वार्धाच्या शेवटीं एक महत्त्वाच्या वृत्तांची सनावळी दिल्यानेंहि वाचकांस पुष्कळ सोय झाली असती. विशेषतः उत्तरार्धाच्या विवेचनांत जी समकालीन उत्कर्षापकर्षाची मांडणी करून दाखविली आहे ती एकदां सनवार एकत्र करून दिल्यानें विचारी वाचकाला अधिक चालना मिळाली असती.

त्याचप्रमाणें पूर्वार्धांतील हकीकत ज्या ग्रंथांचे आधारें घेतली त्यांची थोडक्यांत माहिती व यादीहि जोडण्यापासून वाचकांस या विषयांचें अधिक खोल अध्ययन करण्यास मोठी मदत झाली असती.

रा. केळकर यांनीं इंग्रजी नांवें सध्यांच्या इंग्रजी उच्चाराप्रमाणें दिलीं आहेत. परंतु त्यावेळचे मराठे या नांवांचा उच्चार कसा करीत हें समजणें मौजेचें आहे. एक लहानसें परिशिष्ट घालून त्यांत हीं नांवें वगैरे देण्यासारखीं आहेत. थोडीं येथें देतों, वाचकास गंमत वाटेल.

वारन हेस्टिंग्ज = हिस्टीन.

फ्रेंच = फरासिस—खुद्द फ्रेंच लोक आपल्यास (ला) 'फ्रांसे' असें म्हणतात त्यावरून.

जनरल—जनराल अगर जर्नेल–मराठे व फ्रेंच यांचा पुष्कळ निकट संबंध आल्यामुळें 'जनराल' वगैरे फ्रेंच वळणाचे उच्चार मराठे करीत. महादजी शिंद्यांचे फौजेंतील पराक्रमी फ्रेंच सेनानी Deboigne व Perron फ्रेंच उच्चार–द ब्वॅंई व पेरॉं–यांचीं नांवें मराठे डभई व पेरू अशीं लिहीत.

वेलस्ली=वसली

अँडर्सन=इंद्रसेन

कौन्सिल=कोसल

सिलेक्ट कमिटी=शिलेट कामिटी

मेडोज=मेडूस अगर मडूस

कीटिंग=किटीण

कर्नल=कारनेल

मिस्तर=मिस्तर अगर मेस्त्र

गॅबिअर=गंभीर

गोडर्ड=गाडर

मॉस्टिन=मुष्टीन इ. इ.

आतां इंग्रज मराठी नांवें कशीं उच्चारीत तें पहा—

फडके=Pharkey

सुवर्णदुर्ग=Severndroog

समशेर बहादुर=Sumla Prahaundera

ममई=Bombay

पण अद्यापिहि पूना, कर्की, गॅंजीज, नर्बुडा इत्यादि हजारों वेडेवांकडे उच्चार आपण प्रत्यहीं ऐकतोंच !

## उत्तरार्ध.

उत्तरार्धाचीं पांच प्रकरणें आहेत. त्यांत किंबहुना सर्व पुस्तकांत जर मुख्य असें प्रकरण कोणचें असलें तर आमच्या मतें "मराठेशाही कशानें बुडाली ?" हेंच होय. या ग्रंथाची मांडणी पहातां रा. वासुदेवशास्त्री जें प्रस्तावनेंत म्हणतात कीं, "ग्रंथकाराच्या या चर्चेपासून निष्पन्न होणारा तात्पर्यार्थ, मराठ्यांचें राज्य इंग्रजांनीं कां व कसें घेतलें हा होय" तें बरोबरच आहे; यासाठीं मुख्यतः त्याचीच चर्चा आम्ही यथाशक्ति पुढें करणार आहों. रा. खरे शास्त्री यांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेंत व या ग्रंथावर जे एकदोन अभिप्राय प्रसिद्ध झालेले पाहण्यांत आले त्यांत मुद्दा हाच आहे. ब्राह्मणांनीं अथवा मराठ्यांनीं एकट्यांनींच स्वराज्य घालविलें कीं काय, जातिभेदरूपी समंध राष्ट्राच्या छातीवर थैमान करीत होता म्हणून "स्वराज्य" नाहींसें झालें, मराठ्यांचें व्यापारी धोरण चुकीचें होतें, इंग्रजांचा चंचुप्रवेश मराठ्यांनीं होऊं दिला हेंच बिघडलें, इत्यादि अनेक

मुद्दयांचा खल करून यांपैकीं एकहि गोष्ट स्वराज्यनाशाचें निखालस कारण म्हणून रा. केळकर यांनीं मान्य केली नाहीं. ते म्हणतात (पृ. १७) "पण राज्य जाण्याचीं खरीं कारणें आमच्या मतें मुख्यतः अशीं दोनच आहेत. पहिलें मराठ्यांमधील सवत्या सुभ्याची आवड आणि जुटीचा, शिस्तीचा व राष्ट्राभिनाचा अभाव; आणि दुसरें कवाइती लष्कर आणि सुधारलेली युद्धसामग्री यांचा अभाव ! " प्रस्तावनेंतील आपल्या म्हणण्याचा मथितार्थ रा. वासुदेवशास्त्री येणेंप्रमाणें सांगतात " देशाभिमानशून्यता, समूहरूपानें कार्य करण्याची नालायकी, स्वार्थसाधनाची बेसुमार हांव, आळस, हेळसांड, दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याची संवय, इत्यादि दुर्गुण आमच्या समाजाच्या अंगीं जे खिळले आहेत तेच आमच्या राज्यनाशाला कारण झाले आहेत. " उपसंहारांत रा. केळकर यांनीं रा. राजवाडे यांचें मत उतरून दिलें आहे त्यांतहि "...परंतु परस्पर विश्वास, देशाभिमान वगैरे जे राष्ट्रीय नीतिमत्तेचे मुख्य घटक त्यांची सर्वत्र वाण पडल्यामुळें या सरदार, शिलेदार व मुत्सद्दी मंडळींनीं बाजीराव ब्रह्मावर्तास गेलेला सुखानें पाहिला ! ब्रह्मेंद्रस्वामीनें घालून दिलेला चुगल्या करण्याचा, भांडणें लावण्याचा व विश्वासघात करण्याचा धडा दोन पिढया गिरवल्याचा हा परिणाम झाला ! " या तिन्ही मतांचें नीट मनन केल्यास तीं जवळ जवळ एकमेकांशीं संवादी आहेत असेंच आढळून येईल. रा. केळकर यांनीं पहिलें म्हणून जें राज्यनाशाचें एक कारण दिलें आहे तें वास्तविक एक म्हणतां येत नाहीं. तें फोडलें म्हणजे त्याचीं चार निराळीं स्वतंत्र शकलें होतात तीं अशीं:—

(१) सवत्या सुभ्याची आवड. खऱ्यांच्या गणनेंतील 'स्वार्थाची बेसुमार हांव' यांत हें मोडतें.

(२) जुटीचा अभाव. यालाच खरे समूहरूपानें कार्य करण्याची नालायकी म्हणून संबोधितात व राजवाडे "परस्परांवरील अविश्वास" इ. नांवें ठेवतात.

(३) शिस्तीचा अभाव. खरे–राजवाडे यांस हें मान्यच आहे.

(४) राष्ट्राभिमानाचा अभाव–खरे, राजवाडे हेंच म्हणतात.

तात्पर्य राजवाडे, खरे व केळकर यांचें या बाबतींत एकमतच आहे; परंतु धुळ्याच्या 'इतिहास आणि ऐतिहासिक' कर्त्यांनीं केळकरांच्या प्रस्तुत वाङ्मयश्राद्धाचा समाचार घेतांना (अंक १९) "मराठ्यांचें स्वराज्य जाण्याचें एकच कारण पल्लेदारी हत्यारांचा अभाव हें होय" असें मत प्रगट केलें आहे. ह्या वाक्याच्या पूर्वी एकदां सदर लेखक म्हणतात " यूरोपच्या भौतिक शास्त्रापुढें महाराष्ट्राला नमावें लागलें". वास्तविक मराठे "लांबपल्ल्याच्या तोफांना व शास्त्राला" भ्याले असा त्यांचा अभिप्राय आहे.ब्राह्मण व मराठे इंग्रजास मुत्सद्दीपणांत हरले असें दुसरें एक मत एका वर्तमानपत्रकर्त्यानें या बाबतींत दिलेलें वाचल्याचें स्मरतें. विद्याप्रसार व विद्यासंवर्धन यांचा म्हणजे धर्मगुरुत्वाचा आपला अधिकार व जबाबदारी ब्राह्मणांनीं यथार्थ रीतीनें ओळखली नाहीं ! देशांत ब्राह्मणवर्गच बुद्धींत अग्रेसर होता व राष्ट्रीय संकटांतून राष्ट्राची नौका बिनधोक पैलतीराला नेण्याचें काम त्यानें बराबर बजाविलें नाहीं, त्यापक्षीं ब्राह्मणांवरच स्वराज्यनाशाचा दोष अधिक लागू होतो असेंहि एका विद्वानाचें तिसरें म्हणणें पडलें आहे. जातिभेदच खरा घातक झाला असें आपलें जुनेंपुराणें ठाम मतहि कित्येकांनीं पुनः या प्रसंगानें जाहीर केलें आहे. इतिहासऐतिहासिककर्त्यांच्या मताचा थोडा विचार आतां येथें प्रथम करूं.

कवाइती लष्कर व सुधारलेली युद्धसामग्री मराठ्यांजवळ नव्हती हें त्यांच्या राज्यनाशाचें दुसरें मुख्य कारण म्हणून रा. केळकर यांनीं कबुली दिलीच आहे व रा. खरेशास्त्री यांसहि हें कारण कबूल आहे. वाद काय तो एवढाच कीं, इतिहासऐतिहासिककर्ते म्हणतात त्याप्रमाणें पल्लेदार हत्यारांचा अभाव एवढें एकच एक कारण स्वराज्यनाशाचें होतें असें ठरतें कीं काय. सुधारलेलीं शस्त्रास्त्रें कशाच्या बळावर गोरे तयार करीत ! तीं मराठ्यांना करतां आलीं नसतीं काय ? हाच मुख्य प्रश्न आहे. युरोपियन लोकांनीं शस्त्रें तयार केलीं तीं अर्थात् त्यांच्या शास्त्रांच्या जोरावर; आणि मराठ्यांजवळ हीं भौतिक शास्त्रें जवळ जवळ शून्यच होतीं किंवा जीं होतीं तीं अस्तंगत होत चाललीं होतीं.सगळें घोडें पेंड खात होतें तें येथेंच ! सन १७३९ त गार्डन साहेब पुण्यावरून जात असतां त्यानें पुण्यास ओतींव तोफांचे गोळ्यांचा कारखाना पाहिला असल्याचें लिहिलें आहे. रा. केळकर

यांनीं ज्या फारेस्ट वरून गार्डनच्या वकालतीचा वृत्तांत उतरून घेतला आहे त्यांत ही महत्त्वाची बाब कशी गाळली समजत नाहीं. गार्डन लिहितो—" I visited the foundry where I saw many coehorns and bombshells said to have been cast there and a form of a thireen inch mortar. I was told they make such with great ease—and have learnt the art of running iron for making shot " ( Forrest, Selctions; पृ. ७९ ) रा. केळकर उलट आपल्या पुस्तकांत पृ. ५४ " गोळे ओतींव नसत घडींव असत " असें लिहितात त्यास वरील माहितीनें बाध येतो. बाकीचे मराठे सोडले तरी महादजी शिंदे यांनीं तरी कवाइती लष्कर नवीन पद्धतीचें जय्यत तयार ठेवून आपला दरारा आसेतुहिमाचल बसविला होता यांत शंका नाहीं ! परंतु महादजी वारल्याबरोबर थोड्याच काळांत निदान दौलतरावाला पेरू सारखे परके, मिजासी व कृतघ्न सेनानायक अनावर होऊन डोईजड झाले; व सगळाच खेळखंडोबा झाला ! पुढें शिखांनीं मराठ्यांची चूक दुरुस्त केली. शीखांचीं पलटणें युद्धांत इंग्रजांस चांगलींच भारी लागलीं ! परक्यांना शीखांनीं फौजेंत तितके डोईजड होऊं दिलें नाहीं. इतकें केलें तरी त्यांस इंग्रजांस अखेरीस हार जावेंच लागलें.याचें कारण काय ? त्यांचे जवळ पल्लेदार हत्यारें नव्हतीं ! हत्याराच्या कामांत तर त्यांनीं शोधकबुद्धिहि दाखविली होती*महादजीप्रमाणें त्यांचे कारखाने परक्यांच्या हातीं

---

* महादजीचा दारूगोळ्याचा कारखाना सँगस्टर या स्कॉच् गृहस्थाच्या देखरेखीखालीं आग्र्यास होता व तो काम युरोपच्या तोडीचें करी. परंतु शीखांचा प्रसिद्ध पुढारी सरदार लेहानासिंग हशमदौला याबद्दल निबंधरत्नमालेंत प्रो.हरिभाऊ लिमये लिहितात, "त्यास अनेक भाषा येत. गणित व जोतिष यांचाहि तो बराच व्यासंग करी. तो पहिल्या प्रतीचा शिल्पी व नवीन शोध करणारा होता...शीखांचा तोफखाना लेहानासिंगानें सुधारला व तो ब्रिटिशांच्या तोफखान्याच्या निदान बरोबरीचा तरी

[ पूर्ण टीप पुढील पृष्ठावर पहा. ]

नव्हते, तरी इंग्रजापुढें शीख कां फिके पडले ? नुसत्या पल्लेदार हत्यारांनीं राष्ट्रांचीं स्वातंत्र्यें राखलीं जाणें व गमावणें शक्य नाहीं. शस्त्राला मुख्य आधार शास्त्राचा. शास्त्र असेल तर शस्त्र ! आणि शीखांजवळ शस्त्रें असलीं तरी शास्त्रांची 'उस्तादगिरी' त्यांस प्राप्त नव्हती ! तो मान इंग्रजांचा होता ! आणि म्हणूनच इंग्रज शेर झाले ! " इंग्रज काय वस्तु आहेत ? " ( १२ वा खंड ) "इंग्रजांत जीव नाहीं !" इत्यादि उद्गार काढणारे जे मराठे त्यांच्या "देखत देखत घरांत" जे इंग्रज "मगरूरीनें" शिरले ते नुसत्या हत्यारांच्या बळावर नव्हे, तर हत्यारें प्रसविणारी मयासुरी बुद्धि व शास्त्र त्यांनीं कमावलें होतें म्हणूनच होय. पुढें पुनः या मुद्द्याचा अन्य प्रसंगानें विचार करावयाचा आहेच. तेव्हां तो येथें सोडून पुढें जाऊं.

आतां ब्राह्मण मुत्सद्देगिरींत हरले या आक्षेपाचा थोडा विचार करूं. ग्रंथकार रा. केळकर यांनीं पृ. १९ वर या मुद्याचा थोडासा खल केला आहे. ते म्हणतात, मराठ्यांतील दूरदर्शी मुत्सद्यांना इंग्रजांचें धोरण दिसत नव्हतें किंवा त्यांच्या मुत्सद्देगिरीचे डावपेंच कळत नव्हते असें नाहीं. केळकर यांचें म्हणणें यथार्थ आहे. खुद्द श्री. शिवाजीमहाराज म्हणजे तर अद्वितीय मुत्सद्दी होते. त्यांनीं दूरदर्शीपणानें नवीन आरमार संस्थापून

---

[ टीप–१३ पृष्ठावरून पूर्ण. ]

करून सोडला. त्यानें ओतलेल्या कित्येक नमुनेदार तोफा शीख युद्धामध्यें ब्रिटिशांच्या हातीं पडल्या. " प्रो. लिमये यांचा हा निबंध मोठा मार्मिक आहे; व सर्वांनीं तो मुद्दाम वाचावा. डमई, पेरू इत्यादिक सरदारांची व एकंदरींत कवाइती कंपूची विस्तृत माहिती व चर्चा त्यांत त्यांनीं केली आहे.

एवंच काय कीं, पल्लेदार हत्यारांचा अभाव हें मराठ्यांच्या स्वराज्यनाशाचें ' एकच एक ' कारण ठरणार नाहीं. शस्त्राबरोबरच मागच्या पुढच्या वाक्यांत शास्त्राचा उल्लेख इतिहास ऐ॰ कर्त्यांनीं केल्याचें वर दाखविलें आहे. परंतु शास्त्राला शस्त्रापुढें ते गौण ठरवितातसें दिसतें, तें यथार्थ नाहीं असें शिखांचे उदाहरणावरून दिसून येतें.

"दर्यांत सर्व टोपीकरांवर इभ्रत पाडिली." ( चिटणीस ). पुढें चिमाजीआप्पानें वसई घेतली तेव्हां आतां आपली घडगत नाहीं हें ओळखून मराठे दरबारीं फूट पाडणेंकरितां व बाजीरावाविरुद्ध शाहूला आपले बाजूस वळविणेंसाठीं इंग्रजांनीं गार्डन व इंचबर्ड या दूतांस मराठ्यांकडे पाठविलें. नानासाहेब अल्पवयी असूनहि त्यानें इंग्रजांचा संशय धरला ! पुढें थोरले माधवराव, नानाफडणीस, विसाजी कृष्ण, पुरुषोत्तम महादेव, महादजी शिंदे, इत्यादि अनेक लहान थोर मराठी मुत्सद्यांना इंग्रजांचा कावा पूर्णपणें कळून चुकला होता असें स्पष्ट दिसतें. "केवळ नाचण्यावऱ्याची भाकर खाऊं परंतु मोंगलास दमास आणूं" (इ.सं.) ही ज्याची पूर्वींची हिंमत तो राघोबा "राज्यलोभाविष्ट" झाल्यामुळें इंग्रजांच्या गळीं पडून "आंगरेजाप्रों थोर वळकट नाहीं म्हणून त्यांचा पक्ष केला. शेवटीं आमचे कपाळानें घालविलें !"; "परंतु सर्वांमध्यें श्रेष्ठ आंगरेज" (म.इ.सा.१२) असा बुद्धिभ्रंश पावून मराठेशाहीचा दुष्मन् बनला. त्याची कजाग व कारस्थानी महामाया म्हणून गणली गेलेली आनंदीबाईसुद्धां इंग्रजांस पक्की ओळखत होती. तिचीं दोन अस्सल पत्रें रा. ब. पारसनीस यांनीं(इ.सं.)प्रसिद्ध केलीं आहेत तीं अत्यंत मनन करण्यासारखीं आहेत. धारेस कैदेंत असतां सदर पत्रें या पाताळयंत्री बाईनें नाना व बापू यांस लिहिलीं आहेत. ती इ. स. १७७८ त सखारामबापूस मोठ्या कळवळ्यानें लिहिते... "हल्लीं इंग्रेज घरांत येऊं पहातात, तमाम अंमल उठवून आपले अंमल बसवितात, आमचें निमित्य करून सर्व दौलतेस गिराईक होतील. सुजादौले व महमद अल्ली यांच्या घरांतून प्रथम चाकरीस येतो म्हणून नम्रतेनें पायरव करून घेतली—आणि आतां उभयतांस पोटापुरतें देऊन सर्व दौलतीचे धनी झाले आहेत. या सर्व गोष्टी तुम्हास ठाऊक आहेत. तसेंच आमच्या घरांत होईल, ते जातीनें खबरदार व मनुष्यें जवळ चांगलीं ऐसे असोन उभयतांच्या गती याप्रमाणें जाल्या. आमचे येथें तो कारभारी जवळ मातबर कोण आहेत व पायरव कोणाची आहे व मर्जीहि कोणत्या तऱ्हेची आहे या सर्व गोष्टी तुम्हांस ठाऊक असोन तुम्ही तिही पिढ्यांचे कारभारी ही ब्राह्मणी दौलत बुडावयाजोगी करितां हें तुम्हास करणें ठीक दिसत नाहीं ... हें कालचक्र विपरीत आलें परंतु आम्हांस हाच भरंवसा आहे कीं, तुम्ही कालचक्रासहि

फिरवाल हें जाणून तुम्हांस पत्र लिहिलें आहे तरी ब्राह्मणी दौलत नीट राहून हुजूरचाहि संतोष राहून सर्व गोष्टी बऱ्या होतील त्या कराव्या; न केल्यास जन्मभर चांगलें केलें आणि शेवटीं म्हातारपणीं इंग्रजांच्या घरांत ब्राह्मणी दौलत घातली हें अपेश येई तो अर्थ न करावा......विशेष ल्याहावें तरी तुमचे दशांशहि आम्हांस समजत नाहीं परंतु यशअपेश याचे धनी तुम्ही. ही गोष्ट लहान माधवराव पाळण्यांत आहेत त्यांसही समजते. मग दहा वर्षांवर जें मनुष्य असेल त्यास न समजेल असा पर्याय नाहीं. आम्ही लिहून विशेष तों नाहीं तुम्ही मोजीतही नाहीं, परंतु आकार दिसत चालला यास्तव सूचना लिहिली आहे." या पत्रावरून बाई किती राजकारणी व दूरदर्शी होती तें स्पष्ट दिसतें. पण कोणाचीच मुत्सद्देगिरी त्यावेळीं सुफल व्हावयाची नव्हती! एक इंग्रज लेखक म्हणतो त्याप्रमाणें कंपनीचें 'इकबल' ऊर्फ दैवच शिकंदर होतें! सन १७६१ च्या जानेवारींत मराठे दुराण्यांनीं पानपतास मोडले त्यावर बरोबर १० वर्षांनींच विसाजी कृष्ण बिनीवाले वगैरे मराठे वीरांनीं मराठ्यांचा भगवा झेंडा दिल्लीवर पुनः रोंवला, त्या प्रसंगीं थोरले माधवराव विसाजीस लिहितात— "इंग्रेज पातशाहाजवळ प्राबल्य त्यास पातशाहास दिल्लीस स्थापावें हा मनसुवा पांचसात वर्षें इंग्रेजांनीं केला आहे. ते पातशहास दिल्लीस आणते तर त्यांचें सामर्थ्य नव्हतें असें नाहीं. आणतेच, परंतु ते पाण्यांतील पावप्यादे इतकी हिंमत त्यांची नाहीं......इंग्रेजांचा प्रवेश दिल्लीस होऊं देऊं नये. दिल्लीस प्रवेश जालियावर उखळणार नाहीं. टोपीकरांत इंग्रेजांनीं डोई उचलली आहे. बंगाल व कलकत्ता व मुछलीबंदर वगैरे बंदरें सुरतपावेतों आपले जप्तींत आणिलीं. कर्नाटक, पायनघाट कुल इंग्रेज महंमदअल्लीखानांनीं आटोपिला. सुरत तों मुंबईप्रमाणें इंग्रेजांनीं आपली केली. दिल्लींत प्रवेश त्यांचा झाल्यास पातशहा जेरदस्त त्यांचा होईल फार अवघड पडेल. इंग्रेज चढी लागला आहे. त्याचें सुख, सुजाउदौला आदिकरून कोणास नाहीं. तरी अमीर सर्व आपले करून, सरदारांची फूट मोडून, एक-होऊन इंग्रज माघारे जात तें करावें. इंग्रजांनीं बंगाला पातशहापासून लिहून घेतला आहे तोहि तजविजीनें सुटे तें पुढें केल्यास होईल......पातशाहा आपला एहसानमंद होऊन पातशाहीचा बंदोबस्त आपले हातून करून घेई ऐशी

कारस्ती जें होईल ते करावीच करावी. मनसुवेबाजपणाचा प्रकार, हरहुन्नरें एकास बैसवावें एकास उठा म्हणावें, आपलें वजन पुरतें त्यावर पाडावें ऐसा समय आहे. यांत जो फैल मजबुदीनें कर्तव्य तो करणें इ. "(इ.सं.)

आतां पुढील पत्र पहा. मराठ्यांचा निजामाकडील वकील गोविंदराव काळे हा प्रसिद्ध मुत्सद्दी लिहितो—"विज्ञापना ऐसीजे-मिस्तर ज्यारज वेली व मिस्तर मेनसेन हे दोघे इंग्रज आले आहेत. त्यांस चाकरीस ठेवावयाची चर्चा नबाबापाशीं जाली. नबाबाचे बोलण्यांत आलें कीं इंग्रजांस चाकर ठेवणें तरी फार वाढवून ठेवूं नये, हळुहळु परिश्रम करावा ही त्यांची चाल; हे लोक चांगले, हा सरंजाम चांगला, आमकें पाहिजे ऐसें करीत करीत कोठी घालावयाची परवानगी घ्यावी, कोठी सिद्ध झाल्यास फैल करावा ऐशी यांची चाल " (इ.सं.) हाच मुद्दा पुरुषोत्तम महादेव-मराठ्यांचा दिल्लीचा वकील—याचे पत्रांत आला आहे—"पत्रीं आज्ञा कीं इंग्रज फार बदमामली आहेत. प्रथम गरिबीनें गोष्ट बोलून आपला कबजा करावा हे चाल त्यांची आहे मागें चिन्नापटण व चंदीचंदावर वगैरे मुलूक त्यांणीं हस्तगत केला व बंगाल पातशाही मुलूक घेऊन असफद्दौला यासी कोणेप्रकारें सलूख राहिला हें सर्व पातशाहाचे ध्यानांत असेलच, या गोष्टी सर्व मनन करून दक्षणचे सर्व रयासतदार एक विचारें होऊन जागोजाग टोपीकरांस ताणा बसविल्या शिक्षा चांगलीच होईल......नजबखानासारिखे दूरअंदेश हुजूर मुखत्यार व नबाब निजामअलीसारखे व आम्हांसारखे फिदवी एकनिष्ठ हुजरचे एकविचारें असल्यास फिरंगी यांनीं काय कर्णें आहे" (खंड १२)

असो ! असे पुष्कळ उतारे देतां येतील. रा. केळकर यांनींहि कित्येक दिले आहेत. मुत्सद्दीपणा म्हणजे तरी काय ? शत्रूचें हृद्गत चतुरपणानें ओळखून त्यावर तोडीदाखल मजबूद मनसुबा करून आपलें राजकारण त्याजवर चालवणें व त्यास आपले मिलाफीत घेणें वा काबूंत आणणें हीच मुत्सद्देगिरी. यालाच डोकें लागतें. चातुर्य, बुद्धि, करामत व कारस्थान यांत मराठे वरचढ नसले तरी कमी नव्हते. 'भले बुद्धीचे सागर नाना, ऐसें नाहीं होणार ' ही पोवाडेकारानें नानाची केलेली स्तुति त्यांनीं डबघाईला आलेली ब्राह्मणी दौलत आपल्या मनसोब्याच्या तलवारीनें शत्रूलाहि थक्क करून कैक वर्षे राखिली म्हणूनच यथार्थ म्हणावी लागते.

सालबाईच्या तहाच्या वेळीं काय किंवा शहाअलमाला दिल्लीस स्थापतांना काय किंवा हैदरनाईकाला मिळता घेऊन इंग्रजांना कोंडतांना काय, मराठ्यांनीं आपलें उपजत कारस्थानी तेज चांगलेंच प्रगट केलें. मराठे काय आणि इंग्रज काय एकमेकांना पुरे ओळखून होते ! “ मराठे बोलतील एक लिहीतील एक ” असा संशय धरून इंग्रज वागत ! ‘ इंग्रज बदमामली ’ आहेत म्हणून मराठे ओरडत ! मराठे व इंग्रज यांनीं एकमेकांना दिलेल्या शिव्या व एकमेकांचीं काढलेलीं उणीं त्यावेळीं ते एकमेकांचे उघड मैदानावर लढणारे दुष्मन् दावेदार होते तेव्हां हिशेबीच मानणें योग्य आहे. मराठ्यांना तरी महाराष्ट्राबाहेर खरे शास्त्री म्हणतात तें ‘महत्तरराष्ट्र’ स्थापिण्याचा काय न्याय्य अधिकार होता ? आतां हिंदुस्थानांतलि कोणत्य हि भागाचे लोकांस आम्ही मराठे, इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज, डचादींच्यापेक्षां अधिक जवळचे होतों खरे. पण चालून आलेल्या लक्ष्मीला कोण व्यवहारी झिडकारील ? स वै मुक्तोऽथवा पशुः ! ! आज आपण सर्वच शंभर वर्षें निराळ्या स्थितींत रुळलों आहोंत व मराठेइंग्रजांचें पूर्वींचें शत्रुत्व आजमित्तीला विद्यमान नसून परस्परांचा कलह असला तरी तो प्रेमकलह आहे, विरोध असला तरी त्याला एका भक्तीची जोड आहे. आम्ही मराठे इंग्रजांविषयीं आदर व सद्भावच राखीत आलों आहोंत. इंग्रज सत्ताधारी असल्यानें कधीं एखादा कर्झन आम्हांस सरसकट ‘खोटे’ म्हणून आमचा उघड राष्ट्रीय उपमर्द करूं शकतो, तथापि तो सर्व रंग आतां पालटत असून ना. किंकेडसारखे राजमंत्री भरकौंसिलांत आमचे गुण वर्णून आपली न्यायप्रीति जागृत असल्याचें दर्शवीत आहेत. असो !

मुसद्दीपणाच्या या प्रश्नाचा असाहि आणखी विचार करण्यासारखा आहे. समजा कीं, एकाद्या वैद्यानें एकाद्या रोग्याची परीक्षा करून त्यास औषध दिलें. त्यानें परीक्षा अगदीं बरोबर केली, परंतु जरूर ती औषधयोजना त्याचे हातून घडण्यासारखी नसल्यामुळें तो करूं शकला नाहीं व रोगी दगावला. येथें प्रश्न असा उभा राहतो कीं, वैद्याची परीक्षा चुकली कीं, औषधयोजना चुकली? परीक्षा चुकून जशी औषधयोजना चुकेल तशीच परीक्षा बरोबर असूनहि केवळ हलगर्जीपणानें किंवा आळसानें औषधयोजना जरूर तशी होणार नाहीं. मराठेशाहीला काय भय

आहे या संकटरोगाची परीक्षा मराठी मुत्सद्यांच्या डोक्यांनीं बरोबर केली होती असें वर दाखविलेंच आहे परंतु त्या सुषेणांच्या अंगीं पाहिजे त्या दिव्य औषधींची योजना करण्याचें सामर्थ्य आटलें होतें !

तिसरा प्रश्न ब्राह्मणांच्या जबाबदारीचा. रा. केळकर यांनीं ब्राह्मणांवर व्यर्थ आग पाखडणाऱ्या पित्तोपहतांना चोख उत्तरें दिलीं आहेत. परंतु ब्राह्मण हे वर्णगुरु म्हणून तेच मुख्यतः राज्यनाशाबद्दल जबाबदार धरले पाहिजेत असें म्हणणें असेल तर त्यांत वावगें कांहीं नाहीं. युरोपियांच्या उच्चतर ज्ञानापुढें ब्राह्मणांची कमाई हलकी लागली व म्हणून न यावा तो प्रसंग ओढवला ही विचारसरणी कठोर वाटली तरी सत्य आहे. परंतु स्वार्थाच्या पायीं भोळ्याभाबड्यांस फसवून कावेबाज ब्राह्मणांनीं दगलबाजीनें दौलत परक्यांच्या घरांत घातली असा जो निरर्गल प्रलाप कोणी कोणी करतात तो सर्वथा असत्य, सर्वथा अन्याय्य व सर्वथा त्याज्य होय.

हिंदुस्थानच्या इतिहासाचा विचार निघालारे निघाला कीं, कित्येकांना जिकडे तिकडे जातिभेदाशिवाय दुसरें तिसरें कांहीं दिसत नाहीं ! सर रिचर्ड टेंपल यांनीं तर ' हिस्टरी आफ दि नेशन्स ' मालेंत हिंदुस्थानाबद्दल लिहितांना अखेरीस जो महासिद्धांत काढला आहे तो असाः—

" Taken all in all the long history of the peoples of India is the story of the effect of a leading principle in social life......For it ( म्हणजे जातिभेद ) has prevented the people from combining against a foreign yoke and that in spite of obvious physical strength, courage and intellectual capacity signs are not wanting of the ultimate breaking down of this feeling now so long established as to be almost an instinct; but so far the caste system has not even been scotched by the many attacks on it internal and external, and so long as it remains a guiding principle of life, so long must

the natives of India render themselves subject to foreign domination " जोंवर जातिभेद तोंवर पारतंत्र्य ! ! असल्या अपसिद्धांताचाहि फोलपणा रा. केळकर यांनीं आपल्या विवेचनांत चांगला प्रस्थापित केला आहे. जातिभेद जिवंत असतांनाहि ' स्वराज्य ' नवीन वेषांत अगदीं जवळ येत चालल्याचा बोभाटा व विश्वास हल्लीं फार फैलावला आहे तो खरा झाल्यास टेंपलसाहेब आपोआपच लटके पडतील !

येणेंप्रमाणें विचार केला तर मराठी राज्याच्या नाशाचें "एकच एक" असें अनन्यसाधारण कारण कांहीं सांगतां येईल किंवा काय हा फार खोल विचाराचा प्रश्न आहे. जातिमत्सर, स्वार्थ, दुही, शस्त्रास्त्रांची कोताई देशाभिमानाचा मुळमुळीतपणा, धर्मभोळेपणा, भिकारीपणा वगैरे दोषांचा राज्यनाशाचें कामीं मोठाच परिणाम घडला यांत शंका नाहीं. आणेवारीच काढली तर या दोषांपैकीं कोणाच्या माथीं राज्यनाशकत्वाचा कितवा हिस्सा मारावयाचा याजबद्दल मतभेद झाला, तरी या सर्वांचें अस्तित्व राज्यनाशाला बरेंच कारण झालें हें खरेंच ठरणार. यांतील कोणतें एकटेंच कारण राज्यनाशाचें निखालस कारण ठरविणें चुकीचें होईल. या दोषांची " एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयम् " अशी स्थिति व्हावी यांत नवल नाहीं. हे दोष कांहीं किरकोळ तर नव्हेतच. तथापि आमचें मतें जर एखादाच दोष सर्वाध्यक्ष म्हणून ठरवायचा असेल तर तो " शास्त्रीय बुद्धी व शास्त्रीय ज्ञानाचा अभाव " हाच ठरवितां येईल. निदान या दोषाकडे शेंकडा ६० जबाबदारी लागू होईल. कारण असें पहा कीं, जातिमत्सर आपणांत नसता, एकवटपणा पक्का बाणला राहता, देशाभिमानहि कदाचित जाज्वल्य असता, इतकेंच काय परंतु नवीन सुधारलेलीं शस्त्रास्त्रें भरपूर असतीं—इतकें मात्र विसरावयाचें नाहीं कीं हीं सर्व शस्त्रास्त्रें परक्यांपासून आपल्या ओटींत दत्तक घेतलेलीं, स्वतः निर्माण केलेलीं म्हणजे पोटचीं नव्हत—आणि इंग्रज व मराठे यांचा लढा पडला असता तर इंग्रजाकडेच जय गेला असता. कदाचित् इंग्रजांना अधिक तयारी करावी लागली असती, कदाचित् त्यांना फार हानि सोसावी लागली

असती, कदाचित् त्यांना मराठयांचा धुव्वा लीलेनें उडवतां आला नसता, तथापि अखेर रा. केळकर सुचवितात त्याप्रमाणें " पांचशें " वर्षांनीं मात्र नव्हे परंतु पांचपन्नास वर्षांतच त्यांनीं आपला शक कायम वसविला असता आणि मराठयांस ताराज केलें असतें ! इंग्रजांजवळ नुसता नवीन शस्त्रांचा भरपूर सांठाच होता असें नव्हे तर शस्त्रास्त्रांचा जिवंत प्रवाह सातासमुद्रा-पलीकडून वहात येत होता. नवीन सुधारणांचे ओघ त्यांत मिसळून हा प्रवाह रुंदावत होता; आमच्याजवळ मात्र नुसते सांठ्याचें सांचवणी राहून आमचा कसा टिकाव लागला असता ? आडाची सर पोहऱ्याला कशी येईल ? आमचें राज्य इंग्रजांस १८१८ त मिळालें नसतें म्हणजे १८११ त वाफेचीं जहाजें या जलचरांनीं चालू केलीं नसतीं काय ? १८२० त विजेची किंवा वायूची रोषनाई लंडनांत झाली ती कांहीं पेशवाई बुडविण्याच्या महोत्सवार्थ लांबणीवर पडली नसती. पुढें एकोणि-साव्या शतकांत सर्व जगाची रहाटी बदलून टाकणाऱ्या ज्या अद्वितीय सुधारणा अथवा फरक पाश्चात्यांनीं घडविले त्यांत अंशभागी होण्याचें भाग्य इंग्रजांना जोंवर निश्चयेंकरून मिळण्याचें बंद झालें नव्हतें व तसें श्रेय राहोच पण नुसती त्याची कल्पनासुद्धां आह्मां मराठ्यांच्या पदरीं पडण्याचा बिंदुमात्रहि संभव नव्हता तोंवर इंग्रज ते इंग्रज व मराठे ते मराठेच राहिले असते ! परक्यांपासून आणलेलीं सुधारणेचीं उसनीं पिसें अंगीं डकवून मराठी डोमकावळ्यांचे मोर बनले असते काय ? डभईच्या जोरावर महा-दजी शिरजोर झाला खरा; पण डभई निशाण सॅव्हायूच्या शुभ्र क्रूसाचें फडफडावीत होता त्याची वाट काय ? भगव्या झेंड्याचा मान तो यांत काय राहिला ? दुसऱ्यांच्या जीवावर उड्या मारण्यांत पुरुषार्थ तो काय होता ? मराठ्यांचा पिंड शास्त्रीय नव्हता; इंग्रजांच्या प्रत्येक रोमारोमांत शास्त्राचा प्राणवायु खेळत होता ! मराठयांचा जोर उसना होता; इंग्रजांचा जोर आंगचा होता ! मराठा खचता होता; इंग्रज वाढता होता ! अशा स्थितींत कोणाचा पेंच कोणावर चालला असता याबद्दल संशय कशाला पाहिजे ? हा उघडा हिशेब आहे ! तोफा, दारूगोळा फिरंग्यांकडून विकत घ्यावयाचें, फारतर त्याना त्रास देऊन सक्तीनें विकावयाला लावावयाचें हा शिलशिला तर श्रीशिवाजीमहाराजांपासूनच चालत आलेला ! जुनी

विद्या वाढविण्याविषयीं,काडीचाहि यत्न आमच्याकडे झालेला दिसत नाहीं! कुशल शिल्पी व कारागीर, कोणी कल्पक देशांत झालेच नसतील असें नाहीं. परंतु सरकारकामीं येणाऱ्या वीरमुत्सद्यांप्रमाणें शिल्पीकारागीर यांस सर्फराज केल्याचीं उदाहरणें मिळत नाहींत! कल्पकाची बोळवण कडीतोड्यावरच होत असावी. रामसिंग मालम काठेवाडांत झाला तसे इकडे बहुत झाले असते. परंतु त्यांस वाढविण्याकडे म्हणावें तसें लक्ष दरबाऱ्यांचें असे कोठें? वैद्यांचीच गोष्ट घ्या. त्यांना शोध करण्याला, धंदा वाढविण्याला उत्तेजन यथायथाच मिळालें. भटाभिक्षुकांतलेच ते! न्हावी म्हणजे आमचे शस्त्रवैद्य! मग पाद्री फिरंगी यांनीं सहजच वैद्य म्हणून पायरव केली. दिल्लींतहि त्यांचा चंचुप्रवेश असाच वैद्यद्वारा झाला. सवाईमाधवरावाच्या पायास औषध लावावयाला पाद्री! "फिरंग्याचें औषध पोटांत घेत असतो" असें कळविण्याचा प्रसंग बिचाऱ्या थोरल्या माधवरावांवर सुद्धां आला. पोटांत शिरलेला फिरंगी कच पोट फोडून बाहेर आला यांत आश्चर्य काय? कर्मनाशीवर पूल बांधावयाचा होता. नदीचें पाणी हटेना, ब्राह्मणांनीं लागलीच घातले देव पाण्यांत! नानाफडणीस जाणता मुत्सद्दी. त्यानें इंग्रज एंजिनीअर बेकर यास कामावर लाविलें! मराठी कारागीर होता कुठें? आतां रघुनाथ हरी शेवाळकर म्हणून झांशीचा एक कऱ्हाडा सुभेदार होता त्यानें मात्र एनूसायक्लोपीडिया ब्रिटानिका मिळवून वयाच्या ६५ व्या वर्षीं इंग्रजी शिकून विद्युत्प्रयोगहि साध्य केले होते असें सर विल्यम हंटरचे लिहिण्यावरून इतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालें आहे! हें उदाहरण म्हणजे मोठीच नवलाची गोष्ट होय यांत शंका नाहीं! तथापि हें असलें फूल चुकूनमाकून आलें तरी 'मूर्ध्नि वा सर्वलोकस्य' अशी स्पृहणीय अवस्था त्यास कदापि न येतां 'विशीर्येत वनेऽथवा' ही दुसरी अवस्थाच त्याचे कपाळीं आल्याविना रहातीना; आणि शेवटीं तसेंच झालें. विद्युत्प्रयोग केले म्हणून तो 'सर्फराज' झाल्याचें नमूद नाहीं; अखेर ब्राह्मणानें जलसमाधि इ० स० १७९६ त घेतली! नुसतें बी वाणकें असून चालत नाहीं त्याला जमीन उत्तम, नांगरट उत्तम, खतपाणी व मशागत उत्तम असेल तरच फळ चांगलें धरतें.

आतां मराठे व इंग्रज, या विषयाचा विचार करतांना आणखी

एक महत्वाची गोष्ट विसरतां कामा नये. मराठे सगळे एकरास आहेत; परंतु इंग्रज मात्र एकराशिक नसून द्विराशिक आहेत म्हणजे इंग्रज दोन रूपाचे आहेतः-- १ विलायतवाले, २ हिंदुस्थानी. आतां हिंदुस्थानी हे कायमचे हिंदुस्थानी नव्हत. परंतु अस्सल विलायतवाल्यांपेक्षां या 'कंपनीच्या नबाबांची' एक निराळी जातच बनली होती असें म्हणावयास हरकत नाहीं. विलायती इंग्रज बिंबस्वरूप होते; हिंदुस्थानी इंग्रज प्रतिबिंबस्वरूप होते ! विलायती इंग्रज मूळ गर्जना होती; हिंदुस्थानी इंग्रज त्याचा पडसाद होता. मूळ स्वरूपाचा अथवा बिंबस्वरूपी विलायती इंग्रजांचा रा. नरसोपंत यांस सदर ग्रंथांत विसर पडला आहे असे दिसतें; अथवा त्यांनीं आपल्या दृष्टीच्या टप्यांतून त्यांना मुद्दाम वगळलें आहे ! सतराव्या शतकाच्या मध्यापासून म्ह० हिंदुस्थानी इंग्रज व मराठे यांची गांठभेट झाले तारखेपासून तों तहत इंग्रेजी काबू काशीरामेश्वरावर चालू लागेपर्यंत सुमारें १५० वर्षे लागलीं. या दीडशें वर्षांत हिंदुस्थानी इंग्रज व मराठे यांची झटापट कशी चालली याचें वर्णन ग्रंथकारांनीं पूर्वार्धांत केलें आहे. परंतु याच दीडशें वर्षांत विलायती इंग्रज काय करीत होते त्याचा सुरम्य चित्रपट त्यांनीं वाचकांसमोर मांडला नाहीं. यामुळें ग्रंथाला एक मोठें वैगुण्य आलें असें आमच्या बुद्धीस वाटतें. या विलायती इंग्रजांच्या चरित्राचे भरदार रंग रा. नरसोपंत यांनीं काढिलेल्या चित्रांत भरले कीं चित्राला नवीन शोभा येते, इतकेंच नव्हे तर मराठे कां नाश पावले याचा चटकन् बोध होतो. सबब आपण घटकाभर या विलायती इंग्रजांच्या इतिहासाची दुर्बीण डोळ्यांवर चढवूं.

पहा, सन १६०० च्या सुमारास इंग्रजांची काय स्थिति आहे ? वैभवशाली इलिझाबेथ राणी राज्यावर आहे. स्पानिश आरमाराचा मोड मोठ्या जुटीनें व जवांमर्दीनें केल्यानें इंग्रजांना मूठभरच नव्हे तर खंडीभर मांस चढलें आहे. लोक सुखी आहेत. व्यापार वाढवावा म्हणून पर्यटणें करण्यासाठीं कहर दर्यांत उड्या घेत आहेत. ड्रेक–हॉकिन्स् असले साहसी यांचे– ड्रेक याचा नव्हे तर आमचा कान्होजी आंग्रा यांचा कां ?––पृथ्वीपर्यटणें करून अलोट सोनेचांदी भरभरून घेऊन स्वदेशीं आले. पण सरकार त्यांना 'सर' वगैरे पदव्या व हुद्दे देऊन 'सर्फराज' करण्यास विसरलें नाहीं. त्याच

साहसाच्या आवेशांत आमच्या हिंदुस्थानाशीं व्यापार करण्याची बुद्धि सुदैवानें अगर दुर्दैवानें त्यांना झाली व 'कुंपिणी' बाईचा–ती अजून 'सरकार' व्हावयाची होती–जन्म झाला. जगविख्यात नाटककार शेक्सपीयर याच वेळीं आपले अद्वितीय लेखनकर्मानें लोकांस रिझवीत होता. पुढें स्टुअर्ट राजांचा जुलमी अंमल सुरू झाला तो सुमारें ५० वर्षे सहन केल्यावर याज्ञवल्क्यानें सांगितलेल्या सिद्धांताचा प्रत्यक्ष अनुभव आला. "प्रजापीडनसंतापात्समुद्भूतो हुताशनः । राज्ञः कुलं श्रियं प्राणानदग्ध्वा न निवर्तते" राजा चार्लस लोकांनीं मारला व लोकराज्य सुरू झालें. या लोकसत्तेच्या उदयांत इंग्लंडच्या यशाची गुरुकिल्ली आहे. स्वभावतःच स्वातंत्र्यप्रिय इंग्रजांनीं स्वातंत्र्याचें महाशासन मिळविल्याला त्यावेळीं ४०० वर्षे लोटलीं होतीं. राजा म्हणजे परमेश्वर हें खूळ लोकांनीं अखेर पार उपटून काढलें. आतां मराठ्यांकडे पहा. मुसलमानांच्या मगरमिठींतून स्वदेशाची सोडवणूक करणारा नरवीर शिवाजी क्षितिजावर नुकताच चमकूं लागलेला आहे. म्हणजे मराठे व इंग्रज या दोघांचाहि उत्कर्ष होत चाललेला या काळांत दिसतो. इंग्रजांच्या उत्कर्षाला मात्र एक निराळेंच रूप आंत दिसतें. राष्ट्रीय सत्ता वाढत असतां राजसत्ता मात्र इंग्लंडांत संकोचली व लोकसत्ता राजसत्तेशीं झगडून फोंफावली ! आणि हाच फरक म्हणजे इंग्रजांचा एकलक्षणीय विशेष होय. दुसरा एक लक्षणीय विशेष यावेळीं दिसला, तो म्हणजे त्यांचा 'जळचर'पणा ! हाच पुढें हिंदुस्थानास किंवा जवळ जवळ जगास भोंवणार होता ! टोपीवाले पृथ्वीपती झाले ह्या त्यांच्या पराक्रमाचा उगम त्यांच्या समुद्रवर्चस्वांत होता ! राजापुर, सुरत, मुमई, चिनापट्टण ऊर्फ मद्रास वगैरे स्थळीं टोपीकर आपला जम बसवीत होते. त्यांचा पेशा अद्याप 'सौदागिरी'चा होता; आणि मराठे आपलें स्वातंत्र्य मोंगलांशीं झगडून रक्षित होते. १६८८ त विलायती इंग्रजांनीं जुलमी जेम्सला हुसकून काढलें व त्या खुळ्यानें आपलें शिक्कामोर्तब तमसा तीर्थात फेंकून दिलें व नवीन राजा आपल्या मताला बांधून घेऊन इंग्रजांनीं गादीवर चढविला. ह्याच वेळीं संभाजीच्या गळ्याभोंवतीं औरंगजेबानें आपली तात बहुतेक गुंडाळीत आणली होती. मराठे आत्मसंरक्षणार्थ धडपडून १७०७ पर्यंत औरंगशहाचा रेच त्यांनीं उतरला व धनाजीसंताजीचीं नांवें सर्वतोमुखीं

झाली. त्याच वेळीं इंग्रज आपला हात युरोपाच्या कारस्थानांत पुरता शिरवून ड्यूक ऑफ मार्लबरोच्या अद्वितीय यशाचे वांटेकरी होऊन युरोपांतला औरंग–ह्म. फ्रान्सचा चौदावा लुई याला तंबी पोचवीत होते! अठराव्या शतकांत इंग्लंडची राष्ट्रीय सत्ता ऊर्फ साम्राज्य वाढत गेलें. पश्चिमेकडे अमेरिका त्यांनीं पादाक्रांत केली व पूर्वेकडे हिंदुस्थानांत ते रुजूं लागले! १७०७ तच इंग्लंड व स्कॉटलंड यांचा एकजीव झाला व त्याच सालीं मराठ्यांनीं औरंगाचें ग्रहण पक्कें सोडविलें. अमेरिकेंतलें इंग्रजांचें 'बेट' चांगलेंच वाढलें. इंग्रजांचे पूर्वापारचे प्रतिस्पर्धी फ्रेंच! त्यांचें यांचें निकराचें झुंज होऊन हिंदुस्थान व अमेरिका या दोन्ही खंडांत इंग्रज फत्तेच्या 'मसनदी' वर बसले! इतक्यांत त्यांचा मराठ्यांचा संबंध जडला. बंगाला त्यांनीं घशांत उतरविला आणि दंड थोपटून मराठ्यांशीं ते सलामीला आले. मराठे त्यांना इतर हिंदुस्थानांतल्या बंगाल्यांप्रमाणें अगर मद्राशांप्रमाणें पोकळ न लागतां जरा भारीच लागले; म्हणून मोठी शिकस्त करून त्यांनीं सामदामदंडभेदादि चतुर्विध नीति चालवून अखेर मराठे नेस्तनाबूद केले! अमेरिकेंतलें 'बेट' मात्र स्वातंत्र्याचें शिंग १७७६ त फुंकून फुटून निघालें. आतां घटकाभर इंग्लंडच्या लोकनदीचें रूप पहा! स. १२१५त स्वातंत्र्याचे महाशासनापासून वाहूं लागलेला 'प्रतिपच्चंद्ररेखेव वार्धिष्णु–'मौज पहा कीं श्रीशिवाजीमहाराजांनीं वाढत्या स्वराज्याला उद्देशून आपल्या शिक्यांत हे शब्द योजले होते तेच Broadening down from precedent to precedent या टेनिसननें वर्णिलेल्या इंग्लंडांतील लोकसत्ताप्रवाहाच्या क्षणोक्षणीं रुंदावणाऱ्या पात्राला कसे उत्कृष्ट लागू पडतात –असा लोकसत्तेचा जोरदार जीवनप्रवाह अधिकाधिक उसळूं लागून अठराव्या शतकाच्या अखेरीस व एकोणिसाव्याच्या पूर्वार्धांत तो राजसत्तेला पार विरवून बसला! पार्लमेंट ऊर्फ लोकसभेचा ताबा सर्वत्र व सररास चालूं लागला. राजे लोकांचे ताबेदार बनले व प्रधान लोकमताशीं समरस होत चालले. खुद्द लोकगंगेचें अंतरंगच मोठें चिवट बनलें होतें. एक विल्क्सच्या खटल्याचेंच उदाहरण घ्या. लोकांनीं केवढा नेट दाखविला, आणि आमच्याकडे ब्रिटिश राज्य होऊन शंभर वर्षें भरलीं तरी पुण्यासारख्या शहरीं लोकनियुक्त अध्यक्ष म्युनिसिपालिटींत मोठ्या मामामीनें

२५।३० वर्षांनीं एकदाचा निवडून आला ! मग त्या वेळच्या मराठेशाहींत बुइल्क्स व त्याचा पुरस्कर्ता समाज निर्माण होणें ही असंभाव्य गोष्ट होती. अर्थातच याच वेळीं इंग्लंडांत ३०० वर्षांपूर्वी सुरू झालेल्या मुद्रणकलेच्या प्रभावामुळें कित्येक दैनिकें चाललीं होती. त्यांची गोष्टच इकडे बोलावयास नको.वर्तमानपत्रेंच नव्हतीं;अर्थात् या शास्त्राचा उपयोग करून Let it be impressed into your minds, let it it be instilled into your children, that the liberty of the press is the palladium of all the civil, political and religious rights of an Englishman... They ( i. e. King, Lords and Commons ) are the trustees, not the owners of the estate. असले जोमदार विचार फैलावुन लोकांस खबरदार करणार कोणी ज्युनिअस आमच्या भूमींत जन्मला नाहीं. हें सांगावयास नकोच ! लोकसत्तेचा प्रभावच तसा विलक्षण असतो ! ही लोकसत्ता अशी वृद्धि पावत असतांच शास्त्रीय ज्ञानाचीहि तिकडे झपाट्यानें वाढ होत गेली. लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे कीं, ज्यावेळीं शिवाजीमहाराज विजापूरकरांशीं झगडण्यांत गुंतले होते त्याच वेळीं इंग्लंडांत सन १६६१ त राजा जुलमी वाटत असतांहि त्याचे पुरस्कर्तृत्वानें शास्त्रीय ज्ञानमंडळ अथवा Royal Society of Arts ची स्थापना इंग्लंडांत झाली. जुन्या धर्मभोळेपणाचें ज्ञान काढून टाकून त्याऐवजीं सृष्टिज्ञानाचा ( for the spread of natural instead of supernatural knowledge ) फैलाव करण्यासाठीं सदर मंडळी अवतीर्ण झाली.

बायबलाच्या वाक्यांत सर्व ज्ञान भरलेलें पाहून त्याचा शुष्क काथ्याकूट करीत बसण्याची अजागळ संवय व संकुचित दृष्टि नष्ट करून ज्यानें प्रथम लोकांची दृष्टि ईश्वरी Book of words वरून Book of works कडे म्हणजे बायबलावरून सृष्टीकडे लाविली तो पहिला प्रसिद्ध इंग्रज शास्त्राचार्य फ्रॅन्सिस् बेकन आपला ' नवीन नगारा ' वाजवून लोकांना नुकताच जागें करून गेला होता. पृथ्वीपर्यटन करून व शेक्सपियर वगैरे मनुष्यांच्या

हृदयाचा ठाव काढणाऱ्या नाटककारांची कृति वगैरे पाहून व्यापकदृष्टि झालेले इंग्रज लोक शास्त्रज्ञानाच्या मार्गांत भराभर उड्या घेत चालले. हातमागांत सुधारणा इ० स० १७६४ व ६८ या सालीं होऊन मँचेस्टरच्या प्रचंड कारखान्यांचीं बीजें पेरलीं गेलीं ! लॉक, हॉब्स्, ब्राईल, ब्राऊन हे सारे तत्वज्ञ व शास्त्रज्ञ सतराव्या शतकांतच होऊन गेले. सन १७६५ त ज्यावेळीं माधवराव व रघुनाथराव या चुलत्यापुतण्यांचा कलह चालला होता त्यावेळीं वॅटचें ' वाफेचें यंत्र ' चालू झालें ! वाफगाडीबरोबर आमची बैलगाडी किती टिकणार ? प्रख्यात विद्वान् डॉक्टर जॉनसन् सालबाईचा तह झाल्यावर दोन वर्षांनीं वारला. लोकप्रिय नट ग्यारिक, रसिक कवि गोल्डस्मिथ, अप्रतिम वक्ता बर्क, फर्डा चित्रकार रेनाल्ड्स वगैरे सर्व गुणी लोक अठराव्या शतकांत चमकून गेले. सन १७९२ त वायुदीपांची युक्ति निघाली. सन १७७१ पासून लोकसभेची हकीकत प्रसिद्ध होऊं लागली. इंग्लंडची राष्ट्रीय पेढी तर १६९४ तच स्थापली गेली होती. व तिचा कारभार फार वाढला होता. ॲडम स्मिथसारखे अर्थशास्त्री राष्ट्रीय संपत्तीची मीमांसा करीत होते. असो ! असा हा विलायती इंग्रजांचा इतिहास पाहिला व त्याची समकालीन मराठी इतिहासाशीं तुलना केली तर त्यापासून किती तरी बोध होतो. इंग्रजांचा रस्ताच आमच्यापेक्षां निराळा होता; आम्ही उतरणीवरून हळूहळू खालीं येत होतों. अगदीं प्राचीन काळीं चौदाविद्या व चौसष्ट कला यांचें माहेरघर बनलेला आमचा देश बहुशः सन १००० पासून किंवा त्याच्याहि पूर्वीपासून आळसावला असें दिसतें. आमची प्रगति खुंटली ! पूर्वजांच्या कमाईच्या आयत्या पिठावर आम्हीं रेघोट्या ओढीत बसलों, तेव्हां मुसलमानांची धाड देशावर आली. आम्हीं झुंजांत टिकलों नाहीं. आमची नीतिमत्तेचीं वांगीं पुराणांतच राहिलीं ! जूट गेली, शिस्त गेली, राष्ट्राभिमान ढांसळला, कांहीं खरा कांहीं खोटा धर्माभिमान मात्र राहिला, त्याच्या बळावर व अंगच्या कांहीं शौर्यधैर्यादि सद्‌गुणांच्या बळावर व पूर्वजांच्या थोर पुण्याईवर आम्ही जीव धरून राहिलों ! आम्हांला वाटलें, दैव फिरलें, उपाय नाहीं. आम्हीं मुकाट्यानें मुसलमानांच्या तरवारीपुढें मान वांकवली ! पुढें आम्हांला पातशाहीचाच खोटा अभिमान लागला. श्रीशिवाजीमहाराजांच्या पुण्यप्रतापी

कारकीर्दींत व श्रीसमर्थांच्या सद्बोधामृताचें आकंठ पान केल्यामुळें व श्रीसंताच्या 'निरंतर जागवण्या'मुळें आम्ही कांहीं खळबळ केली. तों आमची इंग्रेजांशीं गांठ आली. शें दीडशें वर्षांत त्यांनीं आमचा नक्ष उतरला; व आम्ही त्यांच्या साम्राज्याचे घटक बनलों ! या सर्व काळांत इंग्रज चढणीवर होते. 'बचकेएवढें'च त्यांचें भिकार बेट पण त्यांतून कर्तबगारीनें बाहेर पडून सर्व समुद्र आपला अंकित करून ते आपल्या गुणानें व श्रमानें व आमच्या अज्ञानामुळें चक्रवर्ती झाले ! ! असा हा त्यांचा आमच्यासंबंधाचा उद्बोधक वृत्तांत आहे !

रा. नरसोपंत यांच्या पुस्तकांतलें विवेचन बहुशः सर्व मराठे व हिंदुस्थानी इंग्रज यांच्या राजकीय स्थितीचेंच आहे. राजकीय स्थितीबरोबरच सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, नैतिक इत्यादि स्थितीचा विचार त्यांनीं केलेला नाहीं. मराठे लोकांबद्दल हें विवेचन करण्याला सामग्री आपल्याजवळ फारच तुटपुंजी आहे; व कै. न्या. रानडे यांनीं पेशव्यांच्या रोजनिशींत लिहिलेल्या प्रस्तावनेंतल्या माहितीप्रमाणें कांहीं ठोकळ माहिती रा. केळकर यांनीं दिलेली आहे. परंतु तुलनेसाठीं हिंदुस्थानची व विलायती इंग्रज यांच्या सामाजिक, आर्थिक, साहित्याविषयक, नैतिक इत्यादि अंगांचा वृत्तांत त्यांनीं दिला असता तर त्यांचें विवेचन बव्हंगीं व बोधप्रद झालें असतें. हा सर्व भाग रा. नरसोपंत यांनीं गाळल्यामुळें त्यांचें विवेचन अर्थातच अपूर्ण राहिलें आहे. आणखी एखादें पुस्तक लिहिल्याशिवाय आपला विषय पूर्ण होणार नाहीं ही जाणीव रा. केळकर यांनीं प्रस्तावनेंत व्यक्त केली आहे. परंतु आम्ही म्हणतों त्या स्वरूपाची माहिती किंवा त्याची रूपरेखाहि त्यांच्या प्रस्तुत ग्रंथांत आढळत नाहीं. येथवर आम्हीं जें विवेचन केलें आहे त्यावरून या नवीन दृष्टीनें तुलनात्मक विचार केल्यास रा.केळकर यांनीं घेतलेल्या विषयाचें विवेचन मोठें हृदयंगम व मोठें उपयुक्त होईल अशी खात्री वाचकांस पटली असेलच.आतां थोडक्यांत १७१४ ते १७६० व १७६० ते १८२० या दोन कालखंडांतील इंग्लंडांतील सामाजिक स्थितीचें चित्र येथें उठवितों.वर जी माहिती दिली आहे त्यांत ठळक ठळक कित्येक गोष्टी सांगून त्यायोगानें इंग्रजी समाजस्थितींत क्रांतीचीं बीजें कशीं रुजूं घातलीं होतीं तें कळेल. हीं बीजें पक्कीं रुजल्यावर

एकोणिसाव्या शतकांत त्यांचे भरघोस वृक्ष फोंफावले. परंतु खुद्द अठराव्या शतकाच्या पूर्वार्धांत हीं प्रागतिक व विशिष्ट बीजें गगळलीं तर सर्व विलायती इंग्रजसमाज व त्यांचा समकालीन मराठ्यांचा समाज यांत प्रगतीच्या दृष्टीनें विशेष फरक आढळणार नाहीं. सन १७१४—१७६० मधील इंग्लंडची स्थिति थोडक्यांत मिसेस ओवेन् यांनीं येणेंप्रमाणें वर्णिली आहे.——

" यावेळीं आगगाड्या नव्हत्या, मोटारी नव्हत्या व पायगाड्याहि नव्हत्या. साऱ्या इंग्लंडांत अवघे चार मुख्य रस्ते होते. रस्ते मोठे फत्तर घालून बनवीत; कित्येक रस्ते म्हणजे मैलोमैल नुसती राड व चिखल. रस्त्यांच्या चकारींच्या खोलीचा कोठें तर अंतच लागत नसे ! झाडांची रस्त्यांवर कोठें एवढी गर्द छाया पसरे कीं रस्ते सर्वदा भिजून चिंब होत; कैकवेळां तर अशी मौज होई कीं एखादी गाडी व घोडे चिखलांत इतके रुतून बसत कीं शेजारून पाजारून जादा घोडे आणून त्यांच्या मदतीनें गाडी व घोडे वर काढावे लागत. ही अशी स्थिती रस्त्यांची होती. 'लंडन ते हरफर्ड' गाडींतून दीड दिवसांत पोंचवूं अशी जाहीरात १७७४ त मोठ्या विजयोत्साहानें एकदां फडकत होती !

शहरें——खुद्द लंडनसुद्धां अद्याप लहान होतीं. आरोग्याचे साधे नियम देखील लोकांना ठाऊक नव्हते. छपरावरून पावसाचें पाणी पडून वाटसरूंना सचैल स्नान होत असे ! रस्त्यांनीं दिव्यांची योजना नव्हतीच म्हणाना. लोक मशाली घेऊन जात. शहरांत ' पोलीस ' नांवाला होते. कोणी म्हातारे 'रामोशी' असत त्यांची टर गांवांतली टवाळ पोरें मौजेनें करीत. रात्रीं रस्त्यांनीं लुटालूट खून वगैरे होण्याची भीति फार असे. माल चोरून शहरांत जकात नाक्यावरून येई. असें म्हणतात देशाला लागणारी निम्मी दारू व बहुतेक सर्व चहा बहुधा जकात चुकवून देशांत घुसे ! सशस्त्र दरवडेखोर माल बेलाशक लांबवीत ! घरांची मोजणी करून त्यांना नंबर पडले नव्हते ! लोकांचे पोषाख हल्लींपेक्षां भडक असत. पहिल्या जार्जाचे कारकीर्दींत सैन्यांतील शिपाई 'युनिफार्म' ( ठराविक पोषाख ) घालूं लागले. दारूबाजीचे अनर्थ पुष्कळ होत होते ! सरकारी शाळा नव्हत्या. खासगी व धार्मिक शाळा मात्र बऱ्याच होत्या. म्हाताऱ्या बाया शाळा चालवीत ! गांवें बहुधा पंचायती पद्धतीनेंच व्यवहार करीत,

गांवचा व्यवहार गांवचेच 'कारूनारू' करीत ! पुष्कळ जमीन पडीत होती. विस्तव चकमकीनेंच पाडीत. मेणबत्या घरींच करीत. हातमाग जुने व साधेच होते. शेतकीची मात्र बरीच प्रगति झाली. माणसांप्रमाणेंच पशूंनाहि खावयाप्यावयाला पाहिजे हें अधिक समजण्यांत आल्यामुळें 'खतांचा' उपयोग लोक करूं लागले होते. गुरांना त्यामुळें खावयाला मुलबक मिळूं लागून तीं पूर्वींपेक्षां वजनाच्या दुप्पट भरूं लागलीं !

लोकांचीं ध्येयें उच्च नव्हतीं. 'येनकेन प्रकारेण' पैसा मिळविण्याकडे सर्वांचें लक्ष असे ! नीति अगदीं कनिष्ठ प्रतीची असे. शिक्षा मोठ्या क्रूर असत ! कायदे कडक होते खरे,परंतु दुकानांतल्या एखाद्या पावावर डल्ला मारला अथवा आठ चार आणे खिशांतून उपटले तर म्हणे देहांत शिक्षा फर्मावीत ! मग खटले तरी कोण करतो ? आणि पंच शिक्षा तरी कशाला ठोठावतील ? तथापि पुष्कळ लोकांना फांशीं देत व शेंकडों तमासगीर वधस्तंभापाशीं जमत ! भररस्त्यावर दहादहा बाराबारा अपराधी एकदम फांसावर लटकावीत ! पुरुषांनाच काय, बायकांना देखील भररस्त्यांवर फटक्यांची शिक्षा देत ! गुलामांचा व्यापार राजरोस चालू होता. मुक्या जनावरांचे हाल तर कोणी कुत्रा खात नव्हता ! तुरुंग म्हणजे तर नरकच होते.तेथें बिगरपरवानगी लग्नें कैदी भटांनीं इतर कैद्यांची बेलाशक लाविलीं तरी चालत. कोण्या एका भट कैद्यानें एका वर्षांत अशीं सहा हजार लग्नें लाविलीं असा दाखला आढळेल !

वेठीची पद्धत चालू होती. चांगला गलेलठ्ठ माणूस दिसला कीं, त्यास आरमाराकडे वेठीला धरून नेत. मात्र कायदा वेठीच्या विरुद्ध होता. गरीबांसाठीं भिक्षागृहें होतीं. नाटकांना गर्दी लोटत असे. अचरट नाटकांना १७३५ पासून आळा पडला होता ! "

तेव्हां आतां साधारणपणें या चित्राचा मराठ्यांच्या अमदानींतील सामाजिक स्थितीचे चित्राशीं–मराठ्यांचें चित्र चांगलेंसें काढण्यास असावें तसें साधन नाहीं–तुलना केली तर काय दिसतें ?

मराठ्यांची स्थिति इंग्रजांपेक्षां पुष्कळ बाबतींत अधिक बरी होती असें सुद्धां म्हणण्यास हरकत नाहीं. मराठे लोकांची नीतिमत्ता श्रेष्ठ होती, त्यांचे

विचार उच्च होते, रस्ते इंग्लंडांतल्यापेक्षां जास्त बरे असावेत, शहरें मोठीं संपन्न, कायदे सौम्य इत्यादि प्रकार पाहतां मराठेशाही अधिक श्रेष्ठच ठरेल. निदानपक्षीं कसाला कमी तर खास लागणार नाहीं.

पण एवढयावरूनच मराठे अठराव्या शतकाचे प्रारंभीं इंग्रजांपेक्षां श्रेष्ठच होते, निदान बरोबरीचे होते असें ठरणार नाहीं. इंग्लंडचें लोकसत्ताक वळण इकडे बिलकुल नव्हतें. इंग्लंडची शोधक बुद्धि इकडे उरली नव्हती. लोकसत्ता अगर शोधकबुद्धि यांचें त्या वेळच्या इंग्लंडांतलें रूप डोळयांत भरण्यासारखें नव्हतें खरें, तथापि हिंदुस्थानच्या अगर मराठयांच्या तुलनेनें पाहतां, बेकन–न्यूटनचा इंग्लंड फार वरचढ ठरला असता. १७१४–६० म्हणजे पहिल्या तीन पेशव्यांची अमदानी–बाळाजीपंत नाना, बाजीराव, नानासाहेब. इंग्लंडांत याच काळांत वालपोल व चथॅम हे प्रसिद्ध मुत्सद्दी झाले. न्यूटन इ. स. १७२७ त वारला. त्याचा जोडीदार त्या वेळच्या मराठयांत एकहि नव्हता. वॉलपोल शांततावादी होता व बाजीराव युद्धशाली होता. वॉलपोलच्या धोरणानें इंग्लंडचें आर्थिक सामर्थ्य वाढलें. बाजीरावाच्या प्रेरणेनें महाराष्ट्राचें ' महत्तर ' राष्ट्र बनूं लागलें व तेंच पुढें अनावर झालें ! वॉलपोल्ला कदाचित् अर्थशास्त्र बाजीरावापेक्षां अधिक समजत असावें असें त्याच्या एक्साईज बिलावरून दिसतें. वॉलपोल गांवढळ होता, परंतु त्याचा प्रतिस्पर्धी प्रधान चॅथॅम हा फार हुषार व कर्ता होता. त्याच्या तोडीचा वक्ता इंग्लंडांत देखील कोणी नव्हता, महाराष्ट्रांत तर या प्रकारच्या सार्वजनिक व व्यावहारिक वक्तृत्वाचें वळणच नव्हतें. चॅथॅमची प्रधानकी फार गाजली व इंग्रजांचे प्रतिस्पर्धी फ्रेंच हे अमेरिकेंत व हिंदुस्थानांत चारी मुंडया चीत झाले ! चॅथमच्या समकालीन नानासाहेब पेशवा. हा सर्व पेशव्यांत अधिक बहुश्रुत दिसतो व लेखक तर चांगल्यांपैकीं होता; मोठा कर्ताहि होता; पण पानपताचा धक्का लागून त्यानें प्राण टाकले आणि चॅथम अमेरिकेच्या स्वातंत्र्याकरितां भांडतांना पुढें वीसपंचवीस वर्षांनीं भर सभेंत मूर्च्छित झाला व पुढें लवकरच वारला.

बाजीराव व नानासाहेब यांच्या समकालीन इंग्रजसमाज जरी इंग्लंडांत अधिक प्रगत नव्हता तरी इंग्रजी समाजांत क्रांतिकारक प्रगतिबीजें

पेरलीं गेलीं होतीं. तीं लोकसत्तेचीं व शास्त्रोदयाचीं बीजें अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांतच अंकुरलीं व पुढें लौकरच फुलोऱ्यावर येऊन त्यांचीं अमृतफळें इंग्रजांना चाखावयास मिळालीं.

१७६० ते १८२० पर्यंतच्या काळांत ज्याला इंग्लंडांतली " औद्योगिक क्रांति " म्हणतात ती घडून आली. हार्गीव्हज्, आॅकराईट, कॅाप्टन वॅट इत्यादिकांनीं यांत्रिक सुधारणा केल्या. अॅडम स्मिथनें १७३६ त राष्ट्रीय संपत्तीची मीमांसा केलीच होती. या यांत्रिक क्रांतीनें इंग्लंडची संपत्ती शिगेला गेली ! देशांत व्यापार वाढला, धंदा वाढला, धाडस वाढले, उद्योग वाढला चतुरपणा वाढला, पैसा अधिक खेळूं लागला, लोक सुखी झाले व राष्ट्राची सर्व कळाच पार पालटून गेली. या यांत्रिक क्रांतीचा मागमूस सुद्धां कोंठें आमच्या हिंदुस्थानांत आढळणार नाहीं. परक्या गोऱ्या व्यापारांचे तांडेच्या तांडे या देशांत कां येऊन थडकत होते त्याची यथार्थ कल्पना आम्हांला येण्यासारखी नव्हती. आमच्या वैभवाच्या फुलांतील " रस निर्भय लुटण्याकारितां " आलेले हे व्यापारी भुंगे पुढें आमच्याच घराचे वांसे खाऊन पोकळ करतील व त्यावरून नांगर फिरवतील हें आम्हांस तेव्हां काय ठाऊक? असो ! याच औद्योगिक क्रांतीच्या काळांत जॉन्सनचा कोश झाला, गिबनचा इतिहास झाला, आणि फॉक्सचें वक्तृत्व झळकलें ! देशांत जो संपत्तीचा पूर वाहूं लागला होता त्याच्याच बळावर नेपोलियनाशींहि इंग्लडनें टक्कर देऊन अखेर त्याला जेरदस्त केलें ! नेपोलियनशीं टिपूनें संधान बांधिलें होतें व मराठ्यांचें त्याकडे लक्ष होतें व ' फरासिशां ' शीं दोस्ती करून इंग्रजांस नतीजा पोंचवावयाचा हा बेत सिद्धीस जाणें कांहीं अशक्यच होतें असें नाहीं. फ्रेंच व मराठे एक झाले असते तर इंग्रज म्हणजे हिंदुस्थानी इंग्रज पाडाव होण्यास कांहीं अडचण पडली नसती पण काय,—इंग्रजांचे ऐवजीं शास्त्रसंपन्न फ्रेंचांभोंवतीं आम्हीं प्रदक्षिणा घातल्या असत्या. असो.

फ्रेंच राज्यक्रांतीचा घडाका युरोपांत उडून सर्व युरोपखंड हादरून गेलें व त्यांतूनच हा नेपोलियन उपटसुंभासारखा वर आला. 'लिबर्ते एगालिते व फ्रातर्निते' स्वतंत्रता, समता व बंधुता यांचा 'गदारोळ' फ्रान्सांत उठला व सर्व फराशिसच नव्हे तर पाश्चात्य लोक बेहोष झाले. पण फरासिशांनीं

आपला राजा मारला ' इ. ठोकळ गोष्टी जाणण्यापेक्षां फ्रेंचक्रांतीचें खरें मर्म व मीमांसा महाराष्ट्रांत किती मुत्सद्यांना व पंडितांना यथार्थ झाली होती ? अथवा झाली असती ? फ्रेंच राज्यक्रांतीच्या अनेक कारणांपैकीं एक प्रमुख कारण म्हणजे इंग्लंडांतील लोकसत्तेच्या उदयानें व लॉक हॉब्स इत्यादि इंग्रज ग्रंथकारांच्या विचारानें उत्पन्न झालेली पोटदुखी होय हें विसरतां कामा नये. इंग्लंडांतला या वेळचा अद्वितीय मुत्सद्दी पिट व महाराष्ट्रांतील नाना फडणीस हे दोघेहि मुत्सद्दी खरे,पण यांत सरस कोण? दोघांत साम्य पुष्कळच आहे. दोघे जात्या शांतस्वभावी असून एकाला फ्रेंचांपासून व दुसऱ्याला इंग्रजांपासून स्वदेश बचावण्यासाठीं वीरवृत्ति धारण करावी लागली. दोघेहि उद्योगी; दोघेहि बुद्धिमान्; दोघेहि मोठे योजक; दोघेहि मोठे कारस्थानी; परंतु ॲडॅम स्मिथचा शिष्य जो पिट त्याला राष्ट्रीय कर्ज, राष्ट्रीय संपत्ति, तिचा क्षय, वृद्धि व विभागणी वगैरे अर्थशास्त्रीय ज्ञान जें होतें तें नानाला कितीसें असेल ? राष्ट्राची नाडी-परीक्षा करण्यांत अर्थात् शास्त्रीय पीट अशास्त्रीय नानापेक्षां सरसच ठरणार. दोघांनाहि आपापले इष्ट हेतु साध्य होऊन शत्रू नेस्तनाबूद झालेला पाहण्याचा सुमंगल प्रसंग येण्यापूर्वींच देह ठेवावे लागले. सुदैवानें पिटचा भाग्यशाली देश विजयी झाला परंतु नानाचा करंटा देश मात्र अपेशी ठरला ! नाना अधिक जगता तर कदाचित् त्याने पाहिजे ती शास्त्रसंपन्नतेची उणीव पै पैसा तरी भरून काढली असती असें एखादे वेळेस वाटतें. उदाहरणादाखल मराठयांची भूगोलविषयक माहिती व तयारी याचाहि विचार केल्यास आमच्या मागें केलेल्या विवेचनास चांगलीच पुष्टी मिळणार आहे.

सवाई माधवराव पेशवे यांचे उपयोगासाठीं नानांनीं लिहविलेलें एक भूगोलप्रकरण रा.ब. पारसनीस यांनीं इतिहाससंग्रहांतून प्रसिद्ध केलेलें आहे. तें मुद्दाम पहाण्यासारखें आहे. रेसिडेंट मॅलेटचा एक हस्तक डाक्तर फिंडले हा पेशव्यांस शिकवी. " बाबाजी (हे) डाक्तर याजपासून भूगोलाचा विषय समजून घेऊन कागदावर बयान लिहीत आहेत " हें वर्णन अशाच एका प्रसंगाचें आहे. याप्रमाणें गुरुत्व शत्रुपक्षाकडे उघड गेलेलें पाहून कोणाहि कडव्या मराठ्यास मोठाच उद्वेग वाटला असेल ! वर उल्लेखिलेल्या भूगोलप्रकरणाची सुरवातच अशी आहे:—

" इंग्रज लोक त्यांच्या उत्पत्तीचा वगैरे मजकूरः—यांची विलायत व यवनांचें रूमस्थान नजीक आहे. रूमाचे पश्चिमेस कहरदर्या. यांत विलायत मुख्य टापू अवरस चवरस पाऊणशें कोस आहे. त्याचें नांव इंग्लिश 'लंधन.' वरकड आणखी समुद्रांत खुष्की बेटें व शहरें बहुत आहेत. कर्नाटकच्या पश्चिम समुद्रांत हजार कोस टापू आहे तेथें फरासीस राहतात. मुख्य टोपीगारांत शिपाई व पादशहा फरासीस व आपले खुष्कीवर मुख्य एकछत्री रूमचा बादशाहा.त्यापासून दिल्ली वगैरे शेकडों सुभे सरसुभे म्हणवितात."......नंतर रूमची हकीकत "अस्तंबोल" मुलूख वगैरे वर्णून शिकंदर बादशाहा रूमांचा म्हणून सांगून त्यानें सर्व पृथ्वी व सर्व दर्या पादाक्रांत करून " साठ घटिका रात्रच " असा अंधार आहे तेथें पावेतों तो गेला असें वर्णिलें आहे. पुढें चीनचें वर्णन पुष्कळ केलें आहे. चीनास " पूर्वी पांडवांनीं मयुसभा केली होती " म्हणून लिहून चीन पाहिला म्हणजे—" स्वर्ग पाहण्याची इच्छा रहात नाहीं " असें म्हटलें आहे. "तेथें दुसरे जातीचें मनुष्य इंग्रज वगैरे कोणासच आपले बंदरांत घेत नाहींत त्यांचे राज्यांत कारागिरी व कसबी अति कुशल लोक" इत्यादि माहिती दिली आहे ती लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. "चहूंकडील बेपारी जहाजें घेऊन जातात.त्यांनी वीस कोसांपलीकडे रहावें आपले बंदरास जहाज ठेवूं देत नाहींत...इंग्रजांचा बेपारी कोणी आला तर त्यानें पन्नास कोसांपलीकडे असावें...रूमाच्या राज्यांत व यवनी विलायत अरबस्थान येथें इंग्रजांची पैरवी अद्यापि नाहीं. पुढें ईश्वरसत्ता. " नंतर प्रसिद्ध चिनी भिंतीची हकीकत असून पुढें "पृथ्वीवर जितका मनुष्यांचा संचार सांप्रत आहे, तितके पृथ्वीवर ~~साडेतीन~~ बादशाहा—मुख्य रूम प्रथम, दुसरा फरासिस तिसरा चीनचा आणि आर्धा इंग्लिश विलायतचा इंग्रज सवदागीर" अशी माहिती दिली आहे. पुढें 'इसा' (येशू) व 'मुसा' ( मोझेस ) यांची कांहीं चुकलीमाकली हकीकत देऊन इसाच्या पक्षाला इंग्रज मिळाले "ते दिवसापासून इसवी सन चालू केले त्यापासून इंग्रज यांची प्रबलता होत चालली कारण हिंदू व मुसलमान यांस गर्व विशेष झाला....पुढें धर्म उच्छिन्न होऊन तेरवी सद्दींत कुफराण माजेल. तेरवी सद्दी म्हणजे सन सुरू झाल्यापासून... तेरावा शेंकडा लागेल ती.... अशी भविष्यें पेशर्जी

जाहलीं आहेत. हिंदूचीहि कलियुगाचीं पांच हजार वर्षे भरत आलीं आणि तेरवी सद्दीहि आली. असे योग एकत्र होऊन दिवसेंदिवस धर्माचा उच्छेद व्हावा, यास्तव इंग्रजी लोकांत ईश्वरी शक्ति जास्त होऊन हिंदू व मुसलमान यांचा गर्व परिहार होऊन इंग्रजांचा व्याप पृथ्वीवर होत चालला. इंग्रजांनी कोसलगार चाळीस असामी करून त्याचें नांव 'कंपीण' असें ठेविलें त्यांजवर बादशहाचा हुकूम आणि कंपिणीचा हुकूम चहुंकडे याप्रमाणें दिवसेंदिवस त्यांची बुद्धि व कल्पना अधिक वाढून जें करतील त्यास यश येत असावें सवदागिरी पेशाने पैरवी करून, ताबेदार म्हणोन राहून राज्यें घेऊन मुखत्यारीनें अंमल करावा परंतु आपण मुखत्यार म्हणवूं नये. इंग्रजी विलायतच्या टापूवर बावन लाख मनुष्य हल्लीं आहे. जकातीचें उत्पन्न बहुत. सर्वांनीं कंपिणीच्या हुकुमानें चालावें. तेथील बादशाहा रयतेच्या स्वाधीन बादशाहा गैर चाल करूं लागल्यास रयतेनें दोनचार वेळ जाहिरनामे करून बादशाहाचे दरवाज्यास लावावे. तितक्यावर समजून नीट वागल्यास उत्तम, नाहीं तर दुसरा बादशहा तख्तावर बसवावा आणि नव्या कल्पना सर्वांनीं काढून सर्वांनुमतें राज्यकारभार चालवावा अशी रीत आहे. " कागद मोठाच मनोरंजक आहे; व फार महत्त्वाचा आहे. नानाफडणिसांचे दसरांतील आहे म्हणजे त्यावेळचाच असावा. आमच्याकडच्या थोरांस व राज्यरक्षणारांस भूगोलाची माहिती याप्रकारची होती तर इंग्रज लोक यावेळीं शास्त्रीय पद्धतीचीं मोजमापें घेऊन रेखीव माहिती तयार करीत ! त्यांनीं 'नक्षे' करावे व मग आम्हीं त्याजजवळून भीक मागून ते घ्यावे. इंग्रजांजवळ या वेळीं छापील नकाशे उत्तम व बिनचूक माहिती देणारे असत. आम्ही कांहीं किल्ल्यांचे मराठी नकाशे आमचे मित्र श्री. आबासाहेब मुजुमदार यांनीं दाखविलेले पाहिले; त्या नुसत्या अंदाजी रेघोट्या होत्या. दुसरा एक हिंदुस्थानचा लेखी मराठी नकाशा त्या कालचा आम्हीं पाहिला आहे, त्यांत ढोकळ मानानें गांवांची दिशा बरोबर आहे. बाकी मोजमापाच्या नांवानें शून्य ! ! म्हणून तर मेकाले साहेबांनीं आमचें पौरस्त्य भूगोलज्ञान म्हणजे दुधातुपांच्या समुद्रांचीं काल्पनिक वर्णनें होत अशी आमची मनसोक्त टेर केली आहे ! !

आपल्या ग्रंथांत रा. केळकर यांनीं मराठ्यांच्या या विद्यावैगुण्याबद्दल चर्चा केली आहे व रा. राजवाडे यांनीं पहिल्या खंडाला लिहिलेल्या बिनमोल प्रस्तावनेंत व्यक्त केलेलें मतहि उतरून घेतलेलें आहे. सुमारें २० वर्षांपूर्वींच गु० राजवाडे यांनीं मराठ्यांचा सांस्कृतिक हीनपणा स्पष्ट करून मांडला होता. रा. खरे शास्त्री यांनीं आपल्या प्रस्तावनेंत मराठ्यांच्या अज्ञानाबद्दल मराठ्यांस रा. केळकर यांचेपेक्षां अधिक दोष दिला आहे. इ. ऐ. कर्त्यांनीं 'यूरपच्या भौतिक शास्त्रापुढें महाराष्ट्राला नमावें लागलें' असें स्पष्ट लिहिलें आहे. परंतु स्वराज्यनाशाच्या कामीं हा दोष, ही आमची अशास्त्रीयताच आम्हांस बहुवंशी मारक झाली असें ठासून कोणी प्रतिपादिलें नाहीं. राज्यनाश होण्याची जी दुही, वगैरे कारणें त्यांतच हें एक जमेला धरलें आहे. म्हणजे आमच्या दृष्टीनें या शास्त्रीयतेचा मारकपणा रा. केळकर यांनीं यथार्थ अजमाविला नाहीं. आमच्या मतें आमची हीनतर भौतिक संस्कृती हीच आमच्या नाशाचें प्रमुख कारण होय व तें कसें तें येथवर आम्हीं दाखविलेंच आहे.

आमच्या या विचारसरणीवर एक आक्षेप असा घेण्यासारखा आहे कीं "कबूल. तुम्हीं म्हणतां कीं शास्त्राभावानें आम्हीं हरलों. तर मग आजमित्तीला अफगाणिस्तान, इराण, स्पेन वगैरे भौतिकशास्त्रांत मागासलेले देश आहेत ते धुळीस मिळून परतंत्र कां झाले नाहींत ?" आक्षेप ठीक आहे. पण जरा खोल विचार केला असतां त्याचें वैयर्थ्य ध्यानांत येईल. अफगाणिस्तानादि देश आज स्वतंत्र आहेत खरे. पण त्यांचा दर्जा जगांत काय आहे ? त्यांचा मान काय आहे ? सुधारलेलीं व पहिल्या प्रतीचीं जीं राष्ट्रें आजमित्तीला आहेत, त्यांचे तुलनेनें यांची मातबरी काय ठरते ? यांचें स्वातंत्र्य यांच्या कर्तबगारीनें राहिलें आहे कीं मोहोबतीनें, कारस्थानानें, 'दोघांच्या भांडणांत तिसऱ्याचा लाभ' अथवा 'ना तुला, ना मला, घाल कुत्र्याला' या न्यायानें राहिलें आहे ? वेळच आली तर आळवावरच्या पाण्याप्रमाणें त्यांचें स्वातंत्र्य क्षणांत उडून जाईल किंवा नाहीं ? या प्रश्नांचीं उत्तरें खास आमच्या विचारसरणीला अनुकूल अशींच द्यावीं लागतील. वर उल्लेखलेल्या राष्ट्रांत किंवा त्याहून पुष्कळ पटीनें सुधारलेल्या चीनसारख्या राष्ट्रांत अर्वाचीन शास्त्रज्ञानाचा नामांकित

उत्कर्ष जरी दृष्टीस पडत नाहीं तरी तेथें आम्हां मराठ्यांच्या पांचवीला पुजलेली दुही तितकी प्रखर नाहीं, मत्सर नाहीं, किंवा देशाभिमानशून्यता नांदत नाहीं. शास्त्राभाववत्ताच्या जोडीला असले राष्ट्रीय दुर्गुण तेथें पोसलेले दिसत नाहींत, म्हणूनच तर तीं कशींबशीं जीव धरून आहेत. पण बलिष्ठ राष्ट्रांचा केव्हां एक फटकारा बसून त्यांचा चक्काचूर उडेल त्याचा नेम नाहीं. इतकें त्यांचें स्वातंत्र्य अशाश्वत, पाण्याच्या बुडबुड्यासारखें आहे. परकीयांना नेटानें विरोध करण्याची हिंमत त्यांना नाहीं. परकीयांच्या लोभाला आळा घालण्याचें सामर्थ्य त्यांना नाहीं. म्हणजे हीं दुबळीं राष्ट्रें स्वतंत्र म्हणण्यापेक्षां परतंत्र, दुसऱ्यांच्या तोंडांकडे घटकोघटकीं बघणारीं अशींच म्हणणें ज्यास्त शोभेल. म्हण आहे कीं 'मिळमिळित सौभाग्यापेक्षां धडधडीत वैधव्य बरें' ! तेव्हां असली पोकळ स्वतंत्रता मोठी भूषणावह गणतां येत नाहीं. आजच पहाना ! देशी संस्थानें हे जुन्या स्वराज्याचे अवशेष म्हणून नांदतांना आपण डोळ्यांनीं पहातों. हे आमचे संस्थानिक कागदावर मात्र इंग्रज बादशहांचे बरोबरीचे दोस्त ठरले, तरी व्यवहारांत त्यांना फारच थोडें स्वातंत्र्य आहे. आमच्या मराठे लोकांत जूट असती, स्वार्थ बोकाळला नसता, चुगलखोरपणा न वाढता, म्हणजे आमचें राष्ट्रीय व नैतिक रक्त बिघडलें नसतें तर कदाचित् शास्त्रवत्ता नसतांनाहि आम्ही कशी तरी वेळ मारून नेऊन नांवाचें स्वातंत्र्य रक्षून गुजराण करीत राहिलों असतों ! निखालस विवश होऊन 'साळंकृत' स्वातंत्र्यदान करण्यापेक्षां आम्हीं दुय्यम तिय्यम प्रतीचे कां होईना, पण स्वतंत्र राहिलों असतों, यांत मात्र शंका नाहीं. आमचा भगवा झेंडा आकाशांत शोभेला फडफडत राहिला असता आणि आमचे घोडेस्वार सकाळीं उगाच दौड करून धूळ उडवीत राहिले असते ! परंतु मग आमचे वीर विजयादशमीला गारपीरावर डेरेदाखल होण्याचे प्रसंग बंद पडले असते व 'मराठे' या नांवाचा दरारा हिंदुस्थानांतून पार लयाला गेला असता ! असलें "आळणी" स्वातंत्र्य काय कामाचें ?

परंतु परमेश्वरी सूत्रच निराळें होतें. आमची इंग्रजांची गांठ पडून आम्हीं हरलों हेंच एक परी बरें झालें असें वाटतें ! आतां तरी आमचे डोळे उघडतील ! ! मराठ्यांची भूगोल वि० माहिती लिहिणारा लेखक

म्हणतो कीं हिंदू व मुसलमान यांस गर्व झाला होता ! तो सर्व हरण करण्यासाठीं इंग्रजांचे ठिकाणीं ईश्वरी अंश अधिक झाला व त्यांचा व्याप पृथ्वीवर वाढला. बिचाऱ्याला काय ठाऊक कीं इंग्रजांनीं स्वपराक्रमानें काय काय कमाई केली होती ? ड्रेकहॉकिन्स्–रॅलेपासून तो पिटवेलींग्टनापावेतों अनेक मानवी देहधारी कर्तबगार थोर पुरुष इंग्लंडांत झाले. त्यांनीं जुलुमी राजसत्ता मोडण्यांत आपलें रक्त खर्चलें–"Freedom that cost our sires their blood"अशा अर्थाची इंग्रजी कव्युक्ति प्रसिद्ध आहे–व लोकसत्तेची व शास्त्राची प्रतिष्ठा केली व वाढविली. 'नर करणी करे तो नरका नारायण होजाय'ही कवीची उक्ति पुढें असतां इंग्रजांच्या बाबतींत सदर लेखकाला ती कां लागू करतां येऊं नये? "दिवसेंदिवस त्यांची बुद्धि व कल्पना वाढून" त्यांनीं वैभव कमाविलें हेंहि तोच पुढें सांगतो. मग मध्यें ईश्वरावर दोष कां ? एकूण लिहिण्याचा मतलब इतकाच कीं, शास्त्रानुकूल्य भरपूर असतें तर मग इतर दोष तसेच रगडूनहि आम्ही टिकाव धरला असता. परंतु शास्त्रानुकूल्य नसतां हे दोषहि जरी नसते तरी वरकरणी स्वातंत्र्यापलीकडे आमची मजल गेली नसती. एवढें वरकरणी स्वातंत्र्य जरी आम्हीं राखून असतों, तरीहि एखाद्या मॉंटेग्यूपुढें भिक्षा मागण्याचा–अथवा गोंडस नांव घ्यावयाचें तर हक्कासाठीं भांडण्याचा—अगर एकाद्या विल्सनपुढें आपली रडकथा गाण्याचा लाजिरवाणा प्रसंग आम्हांवर न येता हें मात्र खचित !

इतका वेळ रा. नरसोपंत यांचे पुस्तकांतील मुख्य विषय जो स्वराज्यनाशाची मीमांसा त्याचें यथामति विवेचन केलें ! त्यांत मुख्यतः इंग्रजांप्रमाणें आम्हांस शास्त्रानुकूल्य नव्हतें, व सहज येण्यासारखेंहि नव्हतें म्हणूनच आमचा नाश झाला; रा. केळकरांनीं इंग्रज व मराठे यांचा राजकीय संबंधच वर्णिला आहे, विलायती इंग्रज व हिंदुस्थानी इंग्रज असें इंग्रजांचें दुहेरी स्वरूप त्यांनीं लक्ष्यांत घेतलें नाहीं; समकालीन उत्कर्षापकर्षाची मीमांसा करितांना इंग्रज व मराठे यांची सामाजिक धार्मिक, आर्थिक, नैतिक इत्यादि नानाविध परीक्षा व तुलना–विरोध दर्शविला नाहीं, इत्यादि मुद्दे प्रस्थापित करण्याचा आम्ही यत्न केला आहे. आनुषंगानें इति० ऐ० कर्ते व इतर एक दोन आक्षेपक यांच्या मतांचाहि थोडा विचार केला आहे. आतां मराठ्यांचें पातशाही धोरण या प्रकरणाकडे जरा वळूं.

नामधारी दिल्लीपती राखून त्याचें नांवाखालीं खरी सत्ता आपल्या हातांत घ्यावयाची व एक हिंदुपदपादशाही स्थापावयाची असें मराठेशाहीचें धोरण होतें असें रा. केळकर म्हणतात. स्थूलमानानें हें बरोबर. परंतु दिल्लीचा कारभार मराठे आटोपणार ते अर्थातच नांवाला कां होईना, परंतु पादशाहाचे 'एकनिष्ठ फिदवी' म्हणूनच आटोपणार. अर्थात् मराठे विरुद्ध मुसलमान अशा पायावर श्री शिवाजी महाराजांनीं चालू केलेली स्वराज्यसंस्थापना कांहीं त्याच स्वरूपांत वाढणें शक्य नव्हतें. स्वराज्याच्या मर्यादा ओलांडून मराठे जसे बाहेरचे देश 'चौथाई'च्या बळावर साध्य करूं लागले तसतसें अर्थातच त्यांस हिंदू व मुसलमान हा भेद जिरवावा लागला. त्यांतूनहि पेशवे जी दौलत वाढवीत होते तिला आनंदीबाईनें 'ब्राह्मणी' म्हटलें आहे तेंहि थोडें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. कांहींहि असो. हिंदुतंत्र अगर ब्राह्मणतंत्र पादशाही चालविणें हेंच मराठ्यांचें साम्राज्यधोरण अगर पादशाही धोरण अगर Imperial policy. स्वराज्य हें त्यांचें खास राज्य ! बाहेरचा मुलूख ते पादशाहाचे 'वकील इ मुतलक' म्हणून पादशाहाचे हुकुमानें वहिवाटणार. धोरण वावगें नव्हतें. क्लाईव्हनें 'दिवाणी' मिळविली त्याचें धोरण तरी हेंच. अर्थात् इंग्रज व मराठे या दोघांची दृष्टी एकाच पातशाहीवर पडून स्पर्धा वाढली व युद्धाला तोंड लागलें ! प्रख्यात इंग्रज वीर वेलिंग्टन् हा मराठ्यांचा मोड करण्यांत प्रमुख होता. त्यानें एका खलित्यांत मराठ्यांना कांहींच स्थिर असें राजकीय धोरण नव्हतें, त्यांचे बेत शेखमहंमदी होते इ० आरोप केले आहेत. कुंपणीसरकाराला मात्र ठराविक नियमबद्ध राजकीय ध्येयें वगैरे युरोपीय राष्ट्रांप्रमाणें आहेत असें ड्यूक येणेंप्रमाणें बजावतो (१८०४):—

" European governments were, till very lately, guided by certain rules and systems of policy, so accurately defined and generally known, that it was scarcely possible to suppose a political event in which the interst and conduct of each state would not be as well known to the corps diplom-

alique in general, as to the statesmen of each particular state.

The Asiatic governments do not acknowledge and hardly know of such rules and systems. Their governments are arbitrary, the objects of their policy are always shifting; they have no regular established system, the effect of which is to protect the weak against the strong; on the contrary, the object of each of them separately and of all of them taken collectively is to destroy the weak; and if by chance they should, by a sense of common danger, be induced for a season to combine their efforts for their mutual defence, the combination lasts only so long as it is attended with success, the first reverse dissolves it; and at all events, it is dissolved long before the danger ceases, the apprehension of which originally caused it.

There can not be a stronger proof of this defect of policy in the Asiatic governments than the dissolution of the combination of the year 1790 between the English, the Mahrattas, and the Nizam, by the attack of the Mahrattas upon the Nizam in the year 1795.

These observations apply to the government of the Marhattas more than to any other of the Asiatic governments. Their schemes and

systems of policy are the wildest of any. They undertake expeditions not only without viewing their remote consequences upon other states or upon their own, but without considering more than the chance of success of the immediate expedition in contemplation. ***

The picture above drawn of the state of politics among Asiatic powers proves that no permanent system can be adopted, which will preserve the weak against the strong, and will keep all for any length of time in their relative situation and the whole in peace, excepting there should be one power which either by the superiority of its strength, its military system, or its resources, shall preponderate and be able to protect all."

ड्यूकाचा उतारा आम्ही मुद्दामच विस्तृत दिला आहे. मराठे ही एक वावटळ आहे व सर्व आशियाटिक खुळे आहेत या भ्रमानें कलुषित दृष्टि झाल्यामुळें ड्यूक अपसिद्धांत प्रतिपादीत आहे. मराठ्यांचें एकंदरींत धोरण काय, त्यांची थोरवी केवढी वगैरेंची सविस्तर चर्चा विद्वद्वर्य कै. न्या. रानडे, सुप्रसिद्ध इतिहासाचार्य गु. राजवाडे वगैरेंनीं केली आहे. कंपनी व युरोपिअन सरकार यांना तेवढी ठरीव राजनीति व धोरणें होतीं, आणि मराठ्यांची राजनीति व धोरण अस्थिर आणि क्षणिक होतें वगैरे ड्यूकाचे आक्षेप भ्रामक आहेत. कंपनीचेंच उदाहरण घ्या. सन १६०० पासून १८०० पावेतों कंपनीचें धोरण काय एकच होतें ! आधीं तागडीतुकाप्पा मग तरवारबहाद्दर—आम्हाला तोफबहाद्दर हा शद्ब योजणें अधिक पसंत आहे—आणि मग तख्तनशीन असे जे तीन रंग कंपिणीचे पालटले ते ड्यूक कसे विसरले? आपले राज्याचा व इभ्रतीचा कष्टमेहनत करून विस्तार करा-

वयाचा हेंच कंपिणीचें धोरण. मराठ्यांचें तरी ध्येय काय होतें ? आपली सत्ता वाढवावी, तमाम रयत सुखी करावी, वैभव भोगावें, व घडल्यास धर्मसंस्थापना करून इहपरलोकीं कृतार्थ व्हावें यापरतें मराठे मुत्सद्दी काय चिंतीत होते ? पुण्यश्लोक श्रीशिवाजीमहाराज—पण यांना ड्यूक कदाचित् लुटारूंचा राजा मानीत असतील—यांची उज्वल राजनीति तर सर्ववंद्यच आहे, परंतु पेशवाईचा अखेरचा एक प्रख्यात मुत्सद्दी गोविंदराव काळे पुढील हर्षोद्गारांत सहज मनाचें हृद्गत ओकून गेला आहे ते उद्गार वाचकांनीं नीट लक्ष्यपूर्वक वाचावे. गोविंदराव नानास सन १७९२ सालीं —मराठ्यांचें वैभव कळसाला पोंचलें त्या वेळीं—लिहितोः—

ऐशियास पत्र पाहतांच रोमांच उभे राहून अतिसंतोष जाला याचा विस्तार पत्रीं किती लिहूं सीमा असे यावरून ग्रंथांचे ग्रंथ मनांत आले ते लिहिल्यानें बहुचकपणा दिसतो दिसो परंतु जें मनांत आले त्यांतून किंचित् अमर्याद करून लिहितों. एक एक रकम मनांत आणून दीर्घ दृष्टीनें तोलून पाहिल्यास खरें आहे असेंच निघेल तें काय तपशील अटक नदीचे पलीकडे दक्षिणसमुद्रपावेतों हिंदूंचें स्थान तुरकस्थान नव्हे हे आपली हद्द पांडवापासोन विक्रमाजितपावेतों त्यांनी राखून उपभोग केला त्यामागें राजकर्ते नादान निघाले यवनांचें प्राबल्य जालें चकत्यांनी हस्तनापुरचें पद घेतलें शेवटीं अलमगिराचे कारकीर्दींत यज्ञोपवीतास साडेतीन रुपये जेजया बसून ओलें अन्न विकावें सर्वांनी घ्यावें हे नौबत गुजारली त्या दिवसांत कैलासवासी शिवाजी महाराज शकशतें व धर्मराखते निघाले त्यांनी किंचित् कोन्यांत धर्मसंरक्षण केले पुढें कैलासवासी नानासाहेब भाऊसाहेब प्रचंडप्रतापसूर्य असें जाले कीं असे कधीं जाले नाहीं अमुक ब्राह्मणानी राज्य केले असे शास्त्रीपुराणीं वर्णन नाहीं परशुराम अवतारी काय असेल ते असो त्या गोष्टी यास शिंदे होळकर दोन बाजू होऊन प्राप्त जाल्या हल्लीं श्रीमंतांचे पुण्यप्रतापेकडून व राजश्री पाटिलबावांचे बुद्धि व तरवारेच्या पराक्रमेकडून सर्व घरास आले परंतु जाले कसे प्राप्त जाले तेणेकडून सुलभता वाटली अगर मुसलमान कोणी असते तरी मोठे मोठे तवारीखनामे जाले असते यवनाच्या जातींत तिळाइतकी चांगली गोष्ट जाल्यास गगना बराबर करून शोभ-

वावी आमचे हिंदूंत गगनाइतकी झाली असतां उच्चार न करावा हे चाल आहे असो अलभ्य गोष्टी घडल्या उग्याच दौलती घुसत घरास आल्या त्याचें संरक्षण करणें परम कठिण दोस्त दुष्मन् फार यवनांचे मनांत कीं काफरशाई जाली हें बोलतात लेकिन ज्यांनीं ज्यांनीं हिंदुस्थानांत शिरें उचलली त्यांची शिरें पाटीलबावांनी फोडली कोणाच्याहि मनांत हे वाहाडले ते शेवटास जाऊं नये यास्तव नाना स्वरूपे व युक्तीकडून नाश करावे ऐसे आहेत न लाभाव्या त्या गोष्टी लाभल्या त्यांचा **बंदोबस्त शककर्त्याप्रमाणें होऊन उपभोग घ्यावे हे पुढेंच आहे कोठें पुण्याईत उणें पडेल आणि काय दृष्ट लागेल न कळे जाल्या गोष्टी यांत केवळ मुलूक राज्य प्राप्त इतकेंच नाहीं तरी वेदशास्त्ररक्षण धर्मसंस्थापन गोब्राह्मणप्रतिपालन सार्वभौमत्व हातीं लागणें कीर्तीयश यांचे नगारे वाजणें इतक्या गोष्टी आहेत** हे किमया सांभाळणें हा हक्क आपला व पाटिलबावांचा यांत वेल्यास पडला कीं दोस्त दुष्मन् मजबूद संशय दूर जाले हें अति चांगलें या उपरी हे जमाव व या फौजा लाहोरच्या मैदानांत असाव्या याचे मनसबे दौडावे वेल्यास पडावे तमाशे पहावे असे जन जे आहेत ते उशा पायथ्यास लागून आहेत चैन नव्हते आतां आपण लिहिल्यावरून स्वस्थ जाले जितके लिहिले इतक्याचे उगेच मनन व्हावें खरें कीं लटकें हे समजावे" इ० वेदशास्त्रसंरक्षण, धर्मसंस्थापन, गोब्राह्मणप्रतिपालन, सार्वभौमत्व व यशकीर्ति इतक्या गोष्टी राज्योपभोगाच्या कर्मांत साधावयाच्या असें गोविंदराव म्हणतो. एवढाच कां होईना पण हेतू कुल मराठे मुत्सद्यांना मान्य होता यांत शंका नाहीं. बादशाही बुचाडावी व मुलुख बेचिराख करून आपण चमन उडवावी असला स्वार्थी व निंद्य हेतु मराठ्यांचा नव्हता. तर ज्या 'धर्मसंस्थापनार्थाय' 'संभवामि युगे युगे' अशी श्रीकृष्ण अर्जुनाला ग्वाही देत होते त्या धर्मसंस्थापनाचा पवित्र हेतू, ध्येय व धोरण त्यांच्या पोटांत होतें इकडे दुर्लक्ष्य करतां कामा नये. हिंदुस्थान हें तुरकस्थान नव्हे असें गोविंदराव नानास निक्षून बजावतो. स्वदेशाची व स्वधर्माची चाड अंतर्यामीं जागृत ठेवून त्या ध्रुवावर लक्ष्य ठेवून मराठे आपला राज्यसंपादनाचा व संवर्धनाचा उद्योग करीत होते. श्री शिवाजी

महाराजांनी धर्मसंस्थापन केलें त्याची आठवण गोविंदरावाला आहे. विक्रमानंतर शिवाजीपर्यंत राज्यकर्ते नादान निघाल्याचेंहि तो बोलून दाखवितो. मात्र नानासाहेब, भाऊसाहेब यांची किंमत गोविंदरावानें श्रीशिवाजीमहाराजांपेक्षांहि अधिक मानली आहे ही त्याची शुद्ध भ्रांति आहे. शिवकालीन महाराष्ट्र हा पेशवेकालीन महाराष्ट्रापेक्षां पुष्कळ उजवा होता यांत संशय नाहीं. शिवाजीमहाराजांनीं धर्मराज्यसंस्थापना केली त्याबरोबर त्यांनीं शेंकडों उत्कृष्ट धारे घालून दिले होते त्यांचें महत्त्व शिवोत्तरकालीन मराठे पुढाऱ्यांच्या लक्ष्यांत आलें नाहीं. शिवाजीच्या पश्चात् मराठी साम्राज्याची थोरवी मात्र वाढली असें म्हणतां येत नाहीं. एक आरमाराची गोष्ट घ्या. शिवाजीनें दूरंदेशीनें दर्यात आपली सत्ता प्रस्थापित केली. हेतु हा कीं हबशी, टोपीकर आदिकरून सर्व मोडून काढून समुद्रकिनारा आपले ताब्यांत सर्वस्वीं ठेवावा. पुढें एक कान्होजी आंग्रे जबरदस्त व कृतकर्मा निघाला; व मराठ्यांचा वचक समुद्रकांठीं त्यानें चांगलाच बसविला. पण तेंच इ. स. १७५५ त नानासाहेब पेशव्यानें तुळाजीला इंग्रजांच्या मदतीनें बुडविला यांतच श्री शिवाजीमहाराजांची दूरंदेशी आपले ठायीं नसल्याचें त्यानें सिद्ध केलें आरमाराचें महत्त्वच शिवाजीइतकें पुढील कर्त्या मराठ्यांना वाटलें नाहीं. शिवाजीनें नव्हतें तें आरमार उत्पन्न केलें; आणि नानासाहेब पेशवे, रामाजी महादेव इत्यादिकांनीं होतें तें घालविलें आणि इंग्रज घरांत घेतला! ओसरी मिळाल्यावर पाय पसरण्याचा गुण भटांचाच विशेष आहे असें नाहीं, तर इंग्रजहि त्यांस तितकेच किंबहुना सवाई तरबेज आहेत असें पुढें अनुभवाला उतरलें. महाराष्ट्राच्या भावी पारतंत्र्याच्या बिडीची पहिली कडी सन १७५५ त नानासाहेबानें न कळत घडविली. शिवाजी महाराजांची पुरी ओळख व मराठी साम्राज्याचें खरें धोरण व त्याचा उमज त्यांच्याच देशांत जन्मलेल्या व त्यांचीच परंपरा संभाळण्याची जबाबदारी असणाऱ्या गोविंदरावासारख्या चतुरस्र व कार्या मुत्सद्यालाहि जेथें नीट पडली नाहीं तेथें परदेशस्थ व शत्रुपक्षीय आणि त्यांतून जेतृपक्षीय डफ्यूकाला त्याचा गंधहि—आणि तोहि आपल्या समोरच्या भ्रष्ट मराठ्यांकडे पाहून—समजला नाहीं यांत डफ्यूकाकडे फारसा दोष देणें वाजवी होणार नाहीं.

मराठेशाहीच्या अंतरंगाची ही ध्येयात्मक चांगली बाजू ओळखण्यास जरी डयूक चुकला तरी तिची वाईट बाजू अगर मुख्य दोष त्यानें बरोबर ताडला आहे. मराठे संघांतील अवयव एकमेकांशीं एकजीव झालेले नव्हते. संघांतील अवयवांना एकत्र बांधणारे सांधे फार कुचकट होते अशी जी त्यानें स्वतःचे डोळ्यांसमोरील मराठेशाही पाहून परीक्षा केली ती अनुभवानेंच खरी ठरली. ' मराठा तितुका मेळवावा । एकविचारें भरावा ' हा समर्थांचा दंडक महाराष्ट्र विसरत चाललें होतें. अर्थातच मराठेशाहीचे घटकावयव विलग पडले. इष्ट अशा मध्यानुवर्ति प्रवृत्तीपेक्षां अनिष्ट अशा मध्यापवर्ती प्रवृत्ति जोरावल्या व मराठशाही म्हणजे कच्या चुन्यांत बसविलेल्या दगडांची इमारत झाली. अर्थात् अशा कच्या जागीं इंग्रजांच्या विलायती पाचरा हेस्तिंग-वेलिंग्टनासारख्यांनीं ठोकठोकून पक्या बसविल्या व मराठेशाहीचा भव्य प्रासाद उखडून पाडला ! !

येथून 'मराठे व इंग्रज यांचा समकालीन उत्कर्षापकर्ष' या उत्तरार्धाच्या पहिल्या प्रकरणाचा किंचित् परामर्ष घेऊं. मराठे व इंग्रज यांच्या संबंधाच्या कालावधीचे चार विभाग रा. केळकर यांनीं केले आहेत. ते असे:— ( १ ) १६४८-१७६१-( २ ) १७६१-१७८६ ( ३ ) १७८६ ते १८०० व (४) १८००-१८१८-आमच्या दृष्टीनें आम्हीं चार कालखंड येणेंप्रमाणें पाडले असते:—

( १ ) १६४८—१७७४-म्हणजे इंग्रजांनी ' साष्टी ' धिटाईनें दडपली तेथ पावेतों. येथून इंग्रज अधिक लगट करूं लागले व मराठ्यांचा वरचढपणा मावळण्यास प्रारंभ झाला.

( २ ) १७७४—१७८४-या काळांत इंग्रजांनीं आपल्या समोरचे मराठे गडी तोलून पाहिले; वडगांवास कच खावी लागल्यामुळें इंग्रज पवित्रा कायम ठेवून सावधपणानें दोन पावलें मागें सरले.

( ३ ) १७८४—१७९६-महादजी वारला, हरिपंत, सवाई माधवराव हे हि आटपले. डिबाइन स्वदेशीं गेला, इ. प्रकारें मराठे कमजोर पडले. ह्या ढिलाईत इंग्रज सरसावले; व पुनः चढाईच्या सामन्याला उभे राहण्याची सिद्धता त्यांनीं केली.

(४) १७९६—१८१८:–मराठ्यांवर डाव येऊन त्यांनीं पड खाल्ली व मराठशाही समाप्त झाली.

'मराठ्यांची राज्यव्यवस्था' ह्या प्रकरणाची सजवणूक रा. केळकर यांनीं केली आहे; यापेक्षां पुष्कळ व्यवस्थित व खुलासेवार करतां येण्याला साधनें आहेत. परराष्ट्राशीं व्यवहार, धर्मनीतिव्यवहार इत्यादि व्यवहारांचा पृथक् विचार ग्रंथांत पाहिजे होता. राज्यविस्ताराचें प्रकरण आधीं घालून मग मराठी राज्यव्यवस्थेचीं प्रधान अंगें व उपांगें यांची कालक्रमवार व सुसंमत मांडणी केली असती म्हणजे प्रकरण चांगलें उठावदार झालें असतें.

शेवटचें प्रकरण उपसंहाराचें. त्यांत मॉरिसन् साहेबांना रा. केळकर यांनीं दिलेला रोकडा जबाब मराठ्याला शोभण्यासारखाच आहे. आमची पूर्वीची स्थिति व आजची स्थिति यांमधील फरक त्यांनीं विशद करून मांडला आहे. पूर्वजांच्या गुणांबरोबरच त्यांच्या दोषांचाहि आपणांस विसर पडतां कामा नये; किंबहुना इतिहासाच्या अभ्यासाचें मुख्य प्रयोजनच तें आहे. एतद्विषयीं रा. राजवाडे यांनीं खंड ३ च्या प्रस्तावनेंत पुढील यथार्थ मत प्रगट केलें आहे:—

"आपले पूर्वज मोठे होते, शूर होते, कर्तृत्ववान् होते, नीतिमान् होते अशी अभिमानाची प्रौढी मिरविण्यांत मौज आहे खरी; परंतु ते सर्वगुण-संपन्न होते, त्यांच्यांत दोष बिलकुल नव्हते, ते नीतीचे केवळ पुतळे होते वगैरे देवांना साजणाऱ्या गुणांचा आरोप त्यांजवर करणें म्हणजे मनुष्य-स्वभावाची अट्टाहासानें थट्टा करणेंच आहे." वर्तमान व भावी पिढ्यांना आपल्या पूर्वजांचे गुणदोष कळावे, कोणत्या गुणांच्या जोरावर त्यांनीं राष्ट्राची उन्नति केली व कोणत्या दोषांच्यामुळें ते राष्ट्राच्या अवनतीला कारण झाले हें ज्ञान त्यांस व्हावें हा तर इतिहास लिहिण्याचा प्रधान हेतु आहे. हें इतिहासकाराचें कर्तव्य ओळखून रा. केळकर यांनी दुरभि-मानाला वश न होतां 'अरिच्याहि सद्गुणांतें प्रेमें वाखाणिताति सुज्ञानी' ही विशाल दृष्टि अंगीकारून पुस्तक लिहिलें आहे, याबद्दल ते प्रशंसेस पात्र आहेत. श्राद्ध हा उत्सव आहे सबब त्या प्रसंगीं गुणांबरोबर दोषांचें संकीर्तन विहित नाहीं असा आक्षेप रा. केळकर यांच्या पुस्तकावर घेण्यांत आला आहे. आमचें उत्तर असें आहे कीं, श्राद्ध हा शब्द नको असेल तर

काढून टाका; किंवा वाङ्मयश्राद्धांना इतर श्राद्धांचीं बंधनें लावूं नका म्हणजे झालें ! केवळ गुणांचेंच संकीर्तन ज्यांना पाहिजे असेल त्यांना बाबू अरविंद घोष यांनीं केलेलें पुढील बहारीचें वर्णन वाचून गुदगुल्या होतील. बाबूसाहेबांनीं मराठ्यांचे गुण फारच उत्कृष्ट जाणून घेतले आहेत:—

" The Maratha race, as their soil and their history have made them, are a rugged strong and sturdy people democratic in their every fibre, keenly intelligent and practical to their very marrow, following in ideas, even in poetry, philosphy and religion the drive towards life and action, capable of great fervour, feeling and enthusiam, like all Indian peoples, but not emotional idealists, having in their thought and speech always a turn for strength, sense, accuracy lucidity and vigour, in learning and scholarship patient, industrious, careful,thorough and penetra ting, in their temperament courageous, pugnacious full of spirit, yet with a tact in dealing with hard facts and circumventing obstacles, shrewd yet aggressive diplomatists, born politicians, born fighters. ''

[मराठ्यांचा देश व मराठ्यांचा इतिहास असाच आहे कीं, त्यायोगें सर्व मराठे कडवे, मजबूद व कणखर बनले आहेत. स्वातंत्र्याची लालसा त्यांचे ठायीं उत्कट आहे. त्यांची बुद्धि प्रखर असून व्यवहारज्ञान त्यांच्या हाडीं-मांसीं खिळलेलें आहे. त्यांचें तत्त्वज्ञान, त्यांचा धर्म, त्यांचीं काव्यें यांपासून जिवंतपणा व कर्तबगारी यांची भरपूर प्रेरणा ते ग्रहण करतात. इतर सर्व भारतीयांप्रमाणें तेहि भावनावश होतात तथापि बेभान होत नाहींत. त्यांचे लेख, त्यांची भाषणें यांत नेहमीं एक प्रकारचा जोम, बिनचूकपणा, व्यवहारदक्षता, प्रसाद व तेज असतें. विद्योपासनेचे कामीं ते 'सावध साक्षेपी आणि दक्ष ' असून मोठे खोल दृष्टीचे व गाढे आहेत. नित्याची राहणी म्हणाल तर फारच साधी, व काटकसरीची असून ते मोठे सोशीक आहेत.

स्वभावांत धाष्टिं व जिवटपणा भारी, उत्साह व तरतरी दांडगी, इतकें असून हि वस्तुस्थितीकडे नजर विशेष व अडथळे उडाविण्यांत प्रवीण, कारस्थानांत सावध परंतु दांडगे, तात्पर्य जातिवंत राजकारणी व जातिवंत लढवय्ये ! !] असो !

रा. केळकर यांच्या ग्रंथाचे परीक्षणाचे प्रसंगानें या विषयावरील आमचे विचार आम्ही येथवर प्रगट केले. वस्तुतः अधिक साधनें बाहेर येऊन विषयाचें स्वरूप अधिक खुलेपर्यंत या विषयावरील विचारांची परिस्फुटता आम्ही करणार नव्हतों. पण रा. केळकर यांच्या ग्रंथाचे योगें तो प्रसंग आला. इतके दिवस या विषयाशीं एकरूप होऊन घालविण्यास सांपडल्यामुळें जर कांहीं उपयुक्त विचार वर आले असतील तर त्याचें श्रेय रा. नरसोपंत केळकर यांसच देणें योग्य आहे. सुमारें वीस वर्षे पूर्वी याच रा. केळकरांनीं 'केसरी'त पुढील विचार व्यक्त केले होतेः—

" वरच्या तीन पिढ्यांचें ऋण जसें आपण श्राद्धकर्मानें फेडतों, तसेंच आपल्या समाजाच्या अनंत पिढ्यांच्या पूर्वजांचें ऋण त्यांच्या इतिहासाच्या उद्धारानेंच फेडलें पाहिजे; व धर्माच्या बाबतींत जसें वाडवडिलांचीं देवस्थानें चालवून त्यांचीं अवदात कर्में आपण सुप्रकाशित करतों, त्याचप्रमाणें त्यांचें शहाणपण व त्यांची नीतिमत्ता यांचें प्रतिबिंब ज्यांमध्यें दिसतें अशीं त्यांचीं व त्यांजविषयीं लिहिलेलीं पत्रें व लेख जगापुढें मांडून त्यांची कीर्ति अक्षय्य करून ठेवणें हेंच आपलें कर्तव्य आहे." त्या कालापासून आज दोन तपें आपला व्यासंग वाढवून रा. केळकरांनीं स्वतः लिहिल्याप्रमाणें आपलें वरील कर्तव्य बजाविलें तसेंच तें इतर सर्वांनीं बजावण्याचा यत्न करावा, आनृण्य जोडावें आणि राष्ट्राला पुनरपि जुन्या वैभवाचें स्मरण द्यावें. भौतिक सत्ता व स्वातंत्र्य यांना आपण मुकलोंच आहों तथापि त्यांची दिव्य स्मृति जागृत असेल तर जुन्या मातींतूनहि पुनः नवे अंकुर फुटतील व विद्यावैभवाचीं गोमटीं फळें आपण नव्हे तरी आपले वंशज चाखतील यांत संशय नाहीं. पण आपली ही प्राचीन स्मृति च जर कां नष्ट झाली तर मग श्रीकृष्णांनीं दिलेला इषाराच खरा झालेला जग पाहील.

" स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति "

---

## ☞ कांहीं वाचनीय व संग्राह्य पुस्तकें.

**श्रीमन्महाभारतावरील उपसंहार.** रु.आ.पै.

श्री. चिंतामणराव विनायक वैद्यकृत. ५—०—०

श्री. नरसिंह चिंतामण केळकरकृत.

**मराठे व इंग्रज.**

[ आवृत्ति तिसरी ] २—४—०

**विलायतचीं बातमीपत्रें.** १—८—०

ट. व्ही. पी. खर्च वेगळा.

**पुस्तकें मिळण्याचा पत्ता:—**

रावजी श्रीधर गोंधळेकर.

यांचा बुकडेपो बुधवार चौक,

पुणें सिटी.

**आमचे मुंबईचे एजंट—**

**परचुरे पुराणीक आणि मंडळी**

**बुकसेलर्स व पब्लीशर्स**

**माधवबाग, मुंबई.**